जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## विविधीकरण भीतीपोटी नसावं



राजन कुटे

गुंतवणुकीबद्दल जागरूकता वाढली आहे, ही चांगली गोष्ट आहे. आज अनेक लोक वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणुकींबद्दल वाचतात, ऐकतात आणि चर्चा करतात, पण या सगळ्यासोबत एक वेगळीच गोष्टही वाढताना दिसते - काहीतरी चुकून राहून जाऊ नये ही भीती.

एखादा नवीन फंड चर्चेत असतो, एखादा सेक्टर वेगाने वाढत असतो, एखादा मित्र वेगळ्या प्रकारची गुंतवणूक करत असतो. मग मनात एक विचार डोकावतो - हे माझ्याकडे आहे की नाहीये.

अनेक वेळा नवीन गुंतवणूक करण्यामागे ठोस कारण नसतं, फक्त इतरांकडे आहे म्हणून ती आपल्या पोर्टफोलिओमध्ये येते वा असावी असं वाटू लागतं.

वरून पाहिलं तर हे विविधीकरण असं वाटेल, पण प्रत्यक्षात ते अनेकदा विस्कळीतपणाकडे जाण्याची सुरुवात असते-

खरं विविधीकरण म्हणजे शक्य तितक्या जास्त गोष्टी विकत घेणं नाही. प्रत्येक नवीन पर्यायाला पोर्टफोलिओमध्ये जागा देणं नाही. उलट, कोणत्या गोष्टींची गरज नाही, हे समजणं तितकंच महत्त्वाचं असतं. काही गुंतवणूकदारांकडे दहा-बारा फंड असतात, काहींकडे त्याहूनही जास्त, पण त्यातील अनेक फंड एकाच प्रकारच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करत असतात, नावं वेगळी असतात, पण दिशा सारखीच असते. मग गुंतागुंत वाढते, पण संरक्षण वाढत नाही.

काही वर्षांपूर्वी गुंतवणुकीचे पर्याय मर्यादित होते. आज परिस्थिती उलट आहे. पर्याय इतके जास्त आहेत की प्रत्येक गोष्ट महत्त्वाची वाटू लागते. पण प्रत्येक संधीचा पाठलाग करणं हे गुंतवणुकीचं उद्दिष्ट नसतं.

खरं तर मजबूत पोर्टफोलिओ अनेकदा साधाच दिसतो. तो प्रत्येक नव्या ट्रेंडमध्ये सहभागी नसतो, प्रत्येक चर्चेत असलेल्या गुंतवणुकीचा भाग नसतो, परंतु वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये टिकून राहण्याची त्याची क्षमता जास्त असते.

गुंतवणुकीत एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे, एखादी गुंतवणूक चांगली असू शकते आणि तरीही ती आपल्या पोर्टफोलिओसाठी योग्य असेलच असं नाही. हा फरक समजला की अनेक अनावश्यक निर्णय टाळता येतात.

काळानुसार संपत्ती निर्माण करणारे गुंतवणूकदार प्रत्येक संधी पकडण्याचा प्रयत्न करत नाहीत. ते काही निवडक गोष्टी सातत्याने आणि शिस्तीने करत राहतात.

शेवटी काय, विविधीकरणाचा उद्देश काहीतरी चुकून राहू नये हा नसतो. त्याचा उद्देश असा पोर्टफोलिओ तयार करणं असतो जो बदलत्या काळातही आपलं काम करत राहील.

शांत ठेवा, स्पष्ट ठेवा.

- **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# गोदावरी महामंडळ कार्यालय स्थलांतराचा विखेंचा 'बालहट्ट'; निर्णय मागे घेतला नाही तर संघर्ष अटळ : खा. निलेश लंके

### शासनाची मंजुरी नसताना कार्यालये हलविण्याचा निर्णय; दक्षिण नगरच्या सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येण्याचे आवाहन

नगर - गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील महत्त्वाच्या विभागीय कार्यालयांचे अहिल्यानगरमधून लोणी येथे स्थलांतर करण्याचा निर्णय हा शासनाची कोणतीही पूर्वमान्यता न घेता घेतलेला असून तो पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा 'बालहट्ट' असल्याची टीका खासदार नीलेश लंके यांनी केली. हा निर्णय तातडीने मागे घेण्यात आला नाही तर शेतकरी, कर्मचारी आणि नागरिकांच्या सहभागातून व्यापक लोकआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

अहिल्यानगर येथे पत्रकार परिषदेत बोलताना खासदार लंके यांनी गोदावरी खोरे महामंडळाच्या कार्यालय स्थलांतराच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी नगरसेवक योगीराज गाडे, अशोक बाबर उपस्थित होते.

कार्यालय स्थलांतरामागे वेगळाच हेतू असल्याची शंका उपस्थित करताना लंके म्हणाले, की कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग आणि मुळा पाटबंधारे विभागाची कार्यालये लोणी येथे हलविण्याचा घाट घातला जात आहे. जलसंपदा विभागांतर्गत कार्यरत असलेल्या गोदावरी व कृष्णा सिंचन विकास महामंडळांचा कारभार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आहे. सिंचन प्रकल्पांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या महामंडळांवर शासनाचे नियंत्रण असताना शासनाला विश्वासात न घेता स्थलांतराचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

ते म्हणाले, ज्या ठिकाणी कार्यालये हलविण्याचा प्रस्ताव आहे, तेथे स्वतंत्र प्रशासकीय इमारत नाही, कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था नाही आणि आवश्यक पायाभूत सुविधांचाही अभाव आहे. अशा परिस्थितीत हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या हिताचा नसून त्यामागे काही वेगळाच हेतू असल्याची शंका निर्माण होते. श्रीरामपूरमध्ये जसे काही प्रकार घडले, त्याच धर्तीवर या जागा एखाद्या खाजगी संस्थेला देण्याचा डाव तर नाही ना, असा प्रश्न निर्माण होत आहे.



या संपूर्ण प्रकरणाची माहिती राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे दिली असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून स्थलांतर प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी आपण केली असल्याचे लंके यांनी सांगितले. निर्णय कायम ठेवण्याचा प्रयत्न झाल्यास लोकशाही मार्गाने संघर्ष उभारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

अहिल्यानगर पाटबंधारे विभागाचे कार्यालय १९३० पासून जिल्हा मुख्यालयात कार्यरत आहे, तर मुळा पाटबंधारे विभागाचे कार्यालय १९५२ पासून येथेच कार्यरत आहे. या कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात अकोले, संगमनेर, राहाता, राहुरी, नेवासा, शेवगाव, पाथर्डी आणि पारनेर या तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे शेतकरी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी जिल्हा मुख्यालयातील ही कार्यालये अधिक सोयीची असल्याचे त्यांनी नमूद केले.

कोणतीही लोकमागणी नसताना तब्बल नऊ दशकांची प्रशासकीय परंपरा असलेली कार्यालये हलविण्याचा हट्ट का धरला जात आहे? असा सवाल उपस्थित करत त्यांनी सांगितले की, स्थलांतरामुळे नागरिकांना अतिरिक्त प्रवास करावा लागेल, वेळ आणि पैशांचा अपव्यय होईल तसेच शेतकऱ्यांच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होतील.

यापुढेही अशाच प्रकारे शासकीय कार्यालये हलविण्याचे प्रयत्न होऊ शकतात, अशी भीती व्यक्त करताना लंके म्हणाले, आज पाटबंधारे विभागाची कार्यालये हलविली जात आहेत. उद्या जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद किंवा इतर महत्त्वाची शासकीय कार्यालयेही स्थलांतरित करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन याला विरोध करणे आवश्यक आहे.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुद्यावरूनही त्यांनी पालकमंत्री विखे पाटील यांच्यावर निशाणा साधला. नगरसाठी मंजूर झालेले वैद्यकीय महाविद्यालय अन्यत्र वळविण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र केंद्रीय समितीसमोर ठाम भूमिका मांडल्यामुळे ते नगरमध्येच राहिले, असा दावा त्यांनी केला.

जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक प्रश्न प्रलंबित असताना विकासकामांऐवजी कार्यालयांचे स्थलांतर करण्यावर भर दिला जात असल्याची टीका करताना त्यांनी जिल्ह्यातील विकासाच्या असमतोलावरही प्रश्न उपस्थित केले. पंतप्रधान आले तर शिर्डीत, गृहमंत्री आले तर शिर्डीत आणि संरक्षणमंत्री आले तर लोणीत येतात. मग कर्जत, जामखेड, पारनेर आणि इतर भागांकडे दुर्लक्ष का केले जाते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संरक्षण विभागाच्या जमिनी उपलब्ध असतानाही त्या परिसरात संरक्षणविषयक उद्योग किंवा प्रकल्प न आणल्याचा आरोप करत त्यांनी राहुरी-ढवळपुरी परिसरातील युवकांच्या रोजगाराच्या संधींकडे दुर्लक्ष झाल्याचे म्हटले. अहिल्यानगरसाठी स्वतंत्र विमानतळाची मागणीही त्यांनी यावेळी पुन्हा केली. शिर्डी विमानतळाला विरोध नसल्याचे स्पष्ट करताना नगरसाठी पूर्वी पिंपळगाव माळवी येथे विमानतळाचा प्रस्ताव होता, त्याचा पुनर्विचार करून उद्योग, व्यापार आणि दळणवळणाला चालना देणारे पाऊल उचलावे, अशी मागणी त्यांनी केली.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या कार्यालयाच्या प्रस्तावित स्थलांतराचाही त्यांनी उल्लेख केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र देऊन अहिल्यानगर हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने राष्ट्रीय महामार्गाचे एक महत्त्वाचे कार्यालय येथेच कायम ठेवण्याची मागणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना लंके म्हणाले की, पक्षाने तयारी करण्यास सांगितल्यामुळे उमेदवारी अर्ज भरण्याची तयारी केली होती. मात्र काही तांत्रिक कारणांमुळे अर्ज दाखल करता आला नाही. महाविकास आघाडीत काँग्रेसकडे सर्वाधिक मतदारसंख्या असल्याने उमेदवारी त्यांच्याकडे देण्याचा निर्णय झाला. महाविकास आघाडीत कोणताही विसंवाद नसून आपण पक्षाचे आदेश मानणारे कार्यकर्ते असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## भिंगारच्या नाईट स्कूलमध्ये चोरी; आरोपी मुद्देमालासह अटकेत

नगर - भिंगार येथील कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका रात्रीच्या शाळेचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला आणि एकूण १९ हजार ५०० रुपये किमतीचे विविध साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंजुम सगीर शेख यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून पोलिसांनी चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. सदर चोरी साहिल राजू काकडे (वय २३, रा.सदर बाजार, भिंगार) याने केल्याचे तपासात उघडकीस आले असून, पोलिसांनी त्याला मुद्देमालासह पकडले आहे.



भिंगारच्या नाईट स्कूलमध्ये चोरी करणाऱ्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्यासमवेत पोलिस पथक.

भिंगार येथील स्नेहालय संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या ऊर्जा बाल भवन अंतर्गत असलेल्या रात्रीच्या शाळेत ही चोरीची घटना घडली. ४ जून रोजी रात्री ८.३० ते ५ जून रोजी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान चोराने शाळेच्या मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा कशाच्या तरी साहाय्याने तोडला. आत प्रवेश करून खोलीतील साहित्य चोरून नेले.

चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये १० हजार रुपये किमतीचा एक एलईडी टीव्ही, ८ हजार रुपये किमतीची ध्वनिक्षेपक यंत्रणा (स्पीकर) व माईक, ५०० रुपयांचा स्टीलचा पिपा (ड्रम), २०० रुपयांची स्टीलची कळशी, ३०० रुपयांची विजेची तार आणि ५०० रुपये किमतीच्या तीन लोखंडी चौकटींचा समावेश आहे. एकूण १९ हजार ५०० रुपयांचा हा मुद्देमाल घेऊन चोर पसार झाला.

शाळेचे कुलूप तुटल्याचे आणि साहित्य गायब असल्याचे लक्षात येताच मदतनीस म्हणून कार्यरत असलेल्या अंजुम सगीर शेख यांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधला. या घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. दरम्यान या गुन्ह्यातील आरोपी साहिल काकडे याला पोलिसांच्या पथकाने मुद्देमालासह पकडले आहे.

सदरची कारवाई सपोनि. जगदिश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, योगेश पवार, पोलिस अंमलदार रेवणनाथ दहिफळे, दीपक शिंदे, रविंद्र टकले, प्रमोद लहारे, कैलास शिरसाठ, पांडुरंग खेडकर, राजू अकोलकर यांच्या पथकाने केली.

## 'ज्ञान भारतम् प्रकल्पा'बाबत ८ जूनला कार्यशाळेचे आयोजन

नगर - भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या ज्ञान भारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अनुषंगाने सार्वजनिक न्यासांकडे उपलब्ध असलेले प्राचीन हस्तलिखिते, ग्रंथ, शिलालेख व ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन व डिजिटायझेशन करण्यासाठी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाच्या वतीने आयोजित ही कार्यशाळा ८ जून २०२६ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथील राजस्व हॉलमध्ये होणार आहे. भारत सरकारने भारतीय ज्ञानपरंपरेचा अमूल्य वारसा जतन करण्यासाठी विकसित केलेल्या मोबाईल ॲप्लिकेशनवर हस्तलिखिते व ऐतिहासिक साहित्य अपलोड करण्याबाबत येणाऱ्या शंका, अडचणी आणि कार्यपद्धती याविषयी संबंधित तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध देवस्थान ट्रस्ट, सांस्कृतिक संस्था, वाचनालये तसेच ऐतिहासिक दस्तऐवज जतन करणाऱ्या सार्वजनिक न्यासांच्या पदाधिकाऱ्यांनी या कार्यशाळेस उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांचे निधन




नगर - नगर शहरावर अपार प्रेम असणारे, निजामकालीन इतिहासाचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ पत्रकार, इतिहास संशोधक, 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाचे प्रेरणास्थान तथा स्नेहालयच्या ९०.४ एफएम 'रेडिओ नगर'चे माजी संचालक भूषण गोपाळ देशमुख (वय ६३) यांचे ६ जून रोजी निधन झाले.

त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी दुपारी ३ ते सायंकाळी ५.३० या वेळेत रेडिओ नगर, लेंडकर मळा, बालिकाश्रम रस्ता येथे ठेवण्यात आले होते. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, सून असा परिवार आहे.

अहिल्यानगरच्या इतिहासाचा खडा न् खडा अभ्यास असलेले भूषण देशमुख हे शहराच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाचे चालते-बोलते ज्ञानकोश होते. नगरच्या समृद्ध इतिहासाची ओळख नागरिकांना करून देण्यासाठी त्यांनी अनेक वर्षे 'हेरिटेज वॉक' हा उपक्रम सातत्याने राबविला. त्यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनातून हजारो नागरिक, विद्यार्थी, संशोधक आणि इतिहासप्रेमींना नगरच्या वैभवशाली इतिहासाचे दर्शन घडले. त्यांच्या लेखणीतून, व्याख्यानांतून आणि संशोधनातून अनेक पिढ्यांना इतिहासाचे अचूक, संदर्भपूर्ण आणि जिवंत स्वरूप अनुभवता आले.

## रमेशचंद्र धूत यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील रमेशचंद्र मिठुलाल धूत (वय ७०, रा.ताराबाग कॉलनी, इंडस्ट्रियल इस्टेट समोर, केडगाव) यांचे ५ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. ६ जून रोजी त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगी, पत्नी, जावई, २ भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या, नातवंडे असा परिवार आहे. बीडचे नगरसेवक शुभम धूत यांचे ते काका होत.

## मुदस्सर रहीम शेख यांचे आकस्मिक निधन



नगर - येथील मुदस्सर रहीम शेख (बल्लुपेंटर) (वय ३९, रा.सीआयव्ही कॉलनी, मुकुंदनगर) यांचे ५ जून रोजी अकस्मिक निधन झाले. त्यांचा दफनविधी हसनशाह कादरी बागवान कब्रस्तान येथे करण्यात आला. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, १ भाऊ, भावजय, ४ बहिणी असा परिवार आहे. अबरार भाई पेंटर यांचे ते बंधू होत.

## प्रकाश श्रीश्रीमाळ यांचे अल्प आजाराने निधन



पुणे - येथील रहिवासी प्रकाश कनकमल श्रीश्रीमाळ (वय ७६) यांचे ५ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम (पुणे) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, २ भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या, सुन, जावई, नातवडे असा परिवार आहे. किशोर श्रीश्रीमाळ यांचे ते मोठे बंधू तर प्रशांत, प्रविण, पूनम सुराणा यांचे वडील होत.

# दरोडा प्रकरणातील संशयित आरोपीचा पोलिसांवर गोळीबार; पोलिस अधिकारी व कर्मचारी बालंबाल बचावले, आरोपी पसार

नगर - सोलापूर जिल्ह्यातील सराफ व्यापाऱ्याच्या दरोडा प्रकरणातील संशयित आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावर आरोपीने गोळीबार केल्याची थरारक घटना ४ जून रोजी रात्री पाथर्डी तालुक्यातील खरवंडी येथे घडली. या गोळीबारात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

यावेळी आरोपी पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड (रा. खरवंडी कासार, ता. पाथर्डी) हा आपल्या साथीदारांसह घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी त्याच्यासह दोन ते तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील सराफा व्यापारी अभिनंदन काशिनाथ पोद्दार यांना अडवून त्यांच्याकडील सोने लुटल्याप्रकरणी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

या गुन्ह्याचा समांतर तपास सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे या दरोड्यात पावलस उर्फ मेहेर गायकवाड याचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय आत्माराम शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथक पाथर्डी येथे दाखल झाले. पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्या समन्वयाने खरवंडी कासार बीटचे पो. कॉ. आसाराम बटुळे व गृहरक्षक मिठू खेडकर यांची मदत घेऊन आरोपीचा शोध सुरू करण्यात आला.

४ जून रोजी रात्री सुमारे १०.३७ वाजता आरोपी आपल्या घरासमोर काही साथीदारांसह पाइपलाइनचे काम करत असल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी सापळा रचून आरोपीला शरण येण्याचे आवाहन केले. मात्र आरोपी पावलस गायकवाड याने पोलिसांचे आदेश धुडकावून लावत त्याने थेट पोलीस पथकाच्या दिशेने गोळीबार केला. ही गोळी पो. कॉ. बटुळे यांच्या अगदी जवळून गेल्याने मोठी दुर्घटना टळली.

यानंतर पोलिसांनी आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने घरासमोर उभी असलेली पांढऱ्या रंगाची एक्सयूव्ही कार घेतली आणि आपल्या साथीदारांसह भरधाव वेगाने बीडच्या दिशेने पलायन केले.घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, पोलिस निरीक्षक विलास पुजारी हे आपल्या पोलीस पथकांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथकांना सूचना दिल्या. या प्रकरणी सपोनि. विजय शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड व त्याच्या दोन ते तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जैन श्रावक संघ येथे वृक्षारोपण करण्यात आले.

## पर्यावरण दिनानिमित्त जैन श्रावक संघाकडून विनायकनगर येथे वृक्षारोपण

नगर - जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जैन श्रावक संघ, विनायकनगर यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जैन श्रावक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला. भविष्यात अधिकाधिक वृक्ष लागवड करून हरित परिसर उभारण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातील. तसेच प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त झालेला हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला असून पर्यावरण संरक्षणाची जनजागृती करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी बोलातना महापालिकेचे माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढ्यांना निरोगी व समृद्ध निसर्ग देण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धन लोकचळवळ उभी राहणे काळाची गरज आहे. समाजाप्रती आपले काहीतरी देणे लागते, या भावनेतून प्रत्येक नागरिकाने सामाजिक बांधिलकी जपत सकारात्मक दृष्टिकोनातून वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे कर्तव्य पार पाडले पाहिजे, असे आवाहन भोसले यांनी केले. यावेळी राजेंद्र भंडारी, किशोर श्रीमाळ, दिलीप पटवा, राजेंद्र गुगळे, संदीप घोडके, मुरलीधर वाघमारे, डॉ. अभय मुथा, राजेंद्र गांधी, नितीन शेलोत, कांतीलाल कटारिया, प्रकाश बलदोटा, अनिल कदम, योगेश मुथा, हिरालाल पटवा, पारस गुंदेचा, सुभाष गुंदेचा, डॉ. अरविंद गुगळे, वैभव फिरोदिया, मनसुखलाल भंडारी, अमृत कटारिया, शरद सुरपूरीया, रसिक बोरा उपस्थित होते.

भोसले म्हणाले, गेल्या वीस वर्षांपासून प्रभागात स्वच्छ, सुंदर, हरित प्रभाग ही संकल्पना राबविण्यात येत असून नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे त्याला मोठे यश मिळाले आहे. दरवर्षी पावसाळ्यात किमान शंभर झाडांची लागवड करून त्यांचे संवर्धन केले जाते. केवळ झाडे लावून थांबून चालणार नाही, तर ती जगविण्याची जबाबदारीही स्वीकारावी लागते. शासन वृक्षलागवडीसाठी हजारो कोटी रुपये खर्च करते; मात्र संवर्धनाच्या अभावामुळे अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत.

राजेंद्र भंडारी म्हणाले, प्रभागाचे नगरसेवक म्हणून गणेश भोसले यांनी अनेक वर्षांपासून वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची प्रभावी लोकचळवळ उभी केली आहे. या उपक्रमात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत असून वृक्षांचे जतन करण्यासाठीही पुढाकार घेत आहेत. त्यांनी लावलेल्या बकुळ वृक्षांवर मोठ्या प्रमाणात पक्षी येतात. त्यामुळे नागरिकांना निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्याची संधी मिळते. वृक्षांमुळे प्रसन्न वातावरण निर्माण होते, असे त्यांनी नमूद केले.

## बाळनाथ गडाचे उत्तराधिकारी धर्मनाथ मालुसरे महाराज यांचा ९ जूनला पदवी प्रदान समारंभ

नगर - नगर तालुक्यातील श्री क्षेत्र बाळनाथ गड येथे ९ जून रोजी हभप धर्मनाथ आदिनाथ मालुसरे महाराज यांचा छगन महाराज मालुसरे यांच्या आशीर्वादाने श्री क्षेत्र बाळनाथ गड उत्तराधिकारी म्हणून पदवी प्रदान समारंभ होणार आहे.



या समारंभानिमित्त सकाळी ७ वाजता चैतन्य बाळनाथांचा अभिषेक होऊन सकाळी ८ वाजता विष्णू याग व दीक्षा समारंभ होईल. याचे पौराहित्य हभप प्रसाद महाराज देव करणार आहेत. सकाळी ९ ते ११ या वेळेत डॉ. विकास महाराज मिसाळ यांचे हरिकीर्तन होणार आहे. त्यानंतर उत्तराधिकारी पदवी प्रदान समारंभ संपन्न होईल, अशी माहिती हभप आदिनाथ छगन महाराज मालुसरे यांनी दिली.

या धार्मिक सोहळ्यासाठी अहिल्यानगरचे खा. निलेश लंके, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, आ. संग्राम जगताप, आ. विक्रम पाचपुते, आ. अक्षय कर्डिले, आ. मोनिकाताई राजळे उपस्थित राहणार आहेत. तरी पंचक्रोशीतील बाळनाथ गडाच्या सेवेत असणारे मान्यवर व्यक्ती, भाविकांनी या समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन वारकरी संप्रदायाच्या वतीने प्रदेश उपाध्यक्ष माऊली गायकवाड यांनी केले आहे.

# जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात वृक्षारोपणाने जागतिक पर्यावरण दिन साजरा

### भारतीय लहुजी सेना व भटक्या विमुक्त समाज संघटनेचा पुढाकार



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरातील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात भारतीय लहुजी सेनेच्या वतीने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.

नगर – जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरातील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात भारतीय लहुजी सेनेच्या वतीने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि हरित भविष्यासाठी समाजात जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आरोटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील सकट आणि भटक्या विमुक्त समाज संघटनेचे शहराध्यक्ष राजाभाऊ वाडेकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रशांत मस्तूद, सचिन घुमरे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. पर्यावरणाचे वाढते प्रश्न, तापमानवाढ, प्रदूषण आणि जंगलतोड याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

सुनील सकट म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. दिवसेंदिवस वाढणारे प्रदूषण, जंगलतोड आणि हवामानातील बदल ही चिंतेची बाब आहे. वृक्ष हे केवळ ऑक्सिजनचे स्रोत नसून संपूर्ण सजीव सृष्टीचे जीवनाधार आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारून वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत सहभागी होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

राजाभाऊ वाडेकर म्हणाले की, आजची पिढी आणि उद्याचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्षारोपणासोबतच प्लास्टिकमुक्ती, पाणी संवर्धन आणि स्वच्छतेच्या उपक्रमांवर भर देणे आवश्यक आहे. विशेष मुलांच्या शाळेत पर्यावरण दिन साजरा करण्यामागे त्यांच्यामध्येही निसर्गप्रेम आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्याध्यापक विजय आरोटे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पर्यावरण शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. वृक्षारोपणासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, निसर्गप्रेम आणि पर्यावरणाबाबतची संवेदनशीलता वाढते. विशेष विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी अशा उपक्रमांची मोठी आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## ईश्वर ही प्रवृत्ती

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स




मला लहानपण आठवते आणि हसू येते. आकाशात देव असतो, ही त्या वेळी समजूत होती. पक्षी आकाशात उंच उडतात, सायंकाळी शेजारच्या फांदीवर येऊन बसतात, हे पाहून मनात यायचे, विचारावे यांना, तुम्हाला देव दिसला? तुम्हाला देव भेटला? काय आकाशात देव? पण ते पक्षी नुसती किलबिल करून उडून जायचे. माझा प्रश्न उडवून लावायचे. आता कळले, की देव आकाशात नसतो. मग कोठे असतो? मूर्तीत? पण लोक म्हणतात, अरे दगडात काय देव शोधतो? माणसात शोधा. म्हणून मी माणसांत देव शोधायला लागलो. अनुभव असा आला, की माणूसच दगड निघाला.

मनाला शुद्ध करणारी प्रत्येक गोष्ट, प्रत्येक जागा म्हणजे ईश्वर. स्वार्थविरहितपणे पालन करणारे, निव्वळ प्रेममूर्ती आई–वडील हेही ईश्वर. म्हणजे ईश्वर ही वृत्ती आहे. ईश्वर ही प्रवृत्ती आहे. जी तुकोबांच्या अभंगानुसार, रंजल्या गांजलेल्यांना उराशी कवटाळणारी आहे. दास–दासींवर पुत्रवत प्रेम करणारी आहे. सर्वांप्रती समभाव बाळगणारी आहे. पर्जन्य नाही का समभावी?

ईश्वर म्हणजे कर्तृत्व. पाऊस पडतो आणि तांदूळ उगवतो, तसा गहूदेखील आणि वनस्पतीदेखील. दोष कर्तृत्वाचा नाही; पेरण्याचा आहे. पेराल ते उगवेल. जसे कराल, तसे पावाल. देवाला निमित्तमात्र म्हणाल.

एक दरिद्री मित्र म्हणाला, 'देव असेल, तर दारिद्र्य हरेल.' त्याला सायंकाळी समुद्रकिनारी वाळूत मातीचा देव सापडला. घरी आणला. देव मिळाला. तेवढ्यात दाराशी कोणीतरी पैसे देऊन मातीचा देव घेऊन गेला. देव त्या माणसाच्या रूपात आला. दुसऱ्या दिवशी सायंकाळी पुन्हा मित्र समुद्रकिनारी गेला. पुन्हा वाळूत मातीचा देव सापडला घरी आणला. देव मिळाला. तेवढ्यात दाराशी कोणीतरी आला. तो मित्राला हातकड्या घालून हिऱ्याची तस्करी करणारा चोर म्हणून झोडपत घेऊन गेला. देव कसा दानव झाला हो ?

हा मानवाच्या मनाचा खेळ आहे. शुद्ध मनाने खेळाल, तर सुख पावाल. मन शुद्ध करावे, मग व्यवहारात पडावे, सुखाने जगावे. ???

– किशोर गांधी

# पर्यावरण संवर्धनासाठी एकीची वज्रमूठ; २० संस्थांचे ९३ प्रतिनिधी एकत्र सहभाग

### कापूरवाडी तलाव परिसरातील वडराईत पर्यावरण परिषद उत्साहात







आत्मनिर्धार फाउंडेशन संचालित पर्यावरण संवर्धन समितीच्या वतीने कापूरवाडी तलाव परिसरातील वडराई येथे आयोजित पर्यावरण परिषदेला पर्यावरणप्रेमींचा प्रतिसाद लाभला.

नगर – आत्मनिर्धार फाउंडेशन संचालित पर्यावरण संवर्धन समितीच्या वतीने कापूरवाडी तलाव परिसरातील वडराई येथे आयोजित पर्यावरण परिषदेला पर्यावरणप्रेमींचा प्रतिसाद लाभला. शहर व जिल्ह्यातील २० हून अधिक संस्थांच्या ९३ प्रतिनिधींनी सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक कृतीची गरज अधोरेखित केली.

वाढते तापमान, घटती जैवविविधता, संभाव्य जलसंकट आणि वाढता कार्बन फूटप्रिंट यांसारख्या गंभीर पर्यावरणीय प्रश्नांवर परिषदेत सखोल चर्चा झाली. पर्यावरणीय संकटांबाबत केवळ चिंता व्यक्त न करता प्रत्यक्ष कृती, लोकसहभाग आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून व्यापक कृती आराखडा राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

परिषदेचे उद्घाटन आयआरएस अधिकारी ओंकार खुंटाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी जगन्नाथ भोर होते. भूजल माहिती केंद्राचे समन्वयक अजिंक्य काटकर, निसर्गप्रेमी महंत बाल ब्रह्मचारी शिवदत्त महाराज, उद्योजक सतीश बोथरा, अमित गायकवाड उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी ओंकार खुंटाळे म्हणाले की, वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने पर्यावरणवादी होणे काळाची गरज आहे. पर्यावरणीय शहाणपण हे केवळ पुस्तकांपुरते न राहता प्रत्यक्ष कृती, निरीक्षण आणि अनुभवातून जीवनात उतरवले पाहिजे. शहरांमधील असंवेदनशील विकास पद्धतींचा परिणाम ग्रामीण भाग आणि संपूर्ण जैवसृष्टीवर होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात जगन्नाथ भोर यांनी जैवविविधता संवर्धनासाठी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विशद केले. सक्षम प्रशासन आणि संवेदनशील समाज यांच्या संयुक्त प्रयत्नांतून पर्यावरण संरक्षण अधिक प्रभावी होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

अजिंक्य काटकर यांनी भूजल पुनर्भरण, जलसंधारण आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून भविष्यातील जलसंकट टाळता येऊ शकते, असे सांगितले. तर महंत शिवदत्त महाराज यांनी देशी वृक्षांच्या लागवड व संवर्धनाला सामाजिक आणि आध्यात्मिक चळवळीचे स्वरूप देण्याचे आवाहन केले.

पर्यावरण परिषदेत जय हिंद फाउंडेशन, कर्म फाउंडेशन, ज्ञान कौशल्य ट्रस्ट, भूमिपुत्र फाउंडेशन, अरण्य फाउंडेशन, हिम सह्याद्री ट्रेकर्स, पीपल्स फॉर निमल्स, पीर बाबा वृक्ष संवर्धन संघ यांच्यासह विविध संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, परिषदेत झालेल्या चर्चेच्या आधारे पुढील वर्षभरासाठी संयुक्त कृती कार्यक्रम तयार करण्यात येणार असून पर्यावरण क्षेत्रात कार्यरत संस्थांसाठी एक सक्षम व्यासपीठ उभारण्यात येणार आहे.

सूत्रसंचालन हभप सिद्धीनाथ मेटे महाराज यांनी केले. पर्यावरण संवर्धन समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सागर दानी, माधुरी चोभे, तुषार लहारे, अजिंक्य सुपेकर, संदीप गेरंगे, किरण खामकर, राहुल ठाणगे, किरण चव्हाण आदींनी मेहनत घेतली.

यावेळी पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल पोपटराव खोसे (आबा) यांना 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. नदीपात्रातील अवैध वाळू उपसा रोखणे, वन्यजीव संरक्षण आणि जलस्रोत संवर्धनासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी तरुणांनी पर्यावरण संवर्धन चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन गाव आणि परिसर समृद्ध करण्याचे आवाहन केले.

पर्यावरणीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येत कृतीशील पर्यावरण चळवळ उभारण्याचा संदेश या परिषदेतून देण्यात आला. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नसून भावी पिढ्यांच्या सुरक्षित भविष्यासाठीची सामूहिक बांधिलकी असल्याचा आशावादी सूर परिषदेत उमटला.

# अहिल्यानगरचे सीए शंकर अंदानी यांची एकाच दिवशी ५ जागतिक विक्रमांची नोंद

### १०४ स्वलिखित पुस्तके, १२ हजारांहून अधिक कविता, लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सकडून गौरव



सीए शंकर अंदानी यांनी एकाच दिवशी पाच जागतिक विक्रमांची नोंद केल्याने लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सकडून त्यांचा गौरव करण्यात आला.

नगर – हिंदी व मराठी साहित्य क्षेत्रात अभूतपूर्व आणि ऐतिहासिक कामगिरी करत अहिल्यानगरचे चार्टर्ड अकाउंटंट सीए शंकर घनश्यामदास अंदानी यांनी एकाच दिवशी पाच जागतिक विक्रमांची नोंद आपल्या नावावर करत साहित्यविश्वात नवा इतिहास रचला आहे. साहित्य निर्मिती, कविता संकलन आणि विक्रमी प्रमाणात पुस्तक प्रकाशन या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावरील लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने घेतली आहे.

सीए अंदानी यांनी एकाच दिवशी तब्बल १०४ स्वलिखित पुस्तके प्रकाशित करून जागतिक विक्रम प्रस्थापित केला. याशिवाय त्यांनी लिहिलेल्या १२ हजार १०० हून अधिक कवितांचे विविध पुस्तकांद्वारे प्रकाशन करण्यात आले असून हा देखील एक स्वतंत्र जागतिक विक्रम म्हणून नोंदविण्यात आला आहे. 'माँ की ममता' आणि 'माँ अनेकता की शक्ति' या शीर्षकाखाली प्रकाशित करण्यात आलेल्या हिंदी काव्यसंग्रहात देशभरातील १४० कवींच्या कविता संकलित करण्यात आल्या आहेत. आई या विषयावर इतक्या मोठ्या प्रमाणात काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा हा जगातील पहिलाच प्रयत्न असल्याचा दावा करण्यात येत आहे. विविध राज्यांतील कवींच्या रचनांना एकत्रित आणून तयार करण्यात आलेला हा काव्यसंग्रह हिंदी साहित्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

याचबरोबर 'वडील : बाबा अबोल जीवनाचे कोडे' या शीर्षकाखाली महाराष्ट्रातील ८० कवींच्या ११६१ कवितांचे संकलन करून मराठी भाषेतील एक भव्य काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला आहे. तसेच 'बहिण माझी प्रिय ताई' या नावाने बहिणीवरील ११६१ कवितांचे स्वतंत्र संकलनही प्रकाशित करण्यात आले आहे. कुटुंबव्यवस्थेतील नातेसंबंधांवर आधारित हे साहित्यिक उपक्रम विशेष ठरत आहेत.

साहित्य क्षेत्रातील या विक्रमी कार्याबद्दल सीए अंदानी यांच्या नावावर एकाच दिवशी पाच जागतिक विक्रमांची नोंद करण्यात आली. या विक्रमांच्या प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा पुणे येथील पत्रकार भवन ऑडिटोरियममध्ये पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामंडलेश्वर आचार्य डॉ. कृष्णदेव गिरी महाराज होते. यावेळी भाजपचे राजेश पांडेय, सहकारी बँकेचे मुख्य प्रशासक विद्याधर अनारसे, लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्सचे बाबी करनानी, अभिजीत जोशी, पद्मश्री भिकू रामजी इदाते, पद्मश्री डॉ. उदय देशपांडे, पद्मश्री चैत्रम पवार उपस्थित होते.

आचार्य डॉ. कृष्णदेव गिरी महाराज म्हणाले की, हा सोहळा केवळ एका व्यक्तीच्या सन्मानाचा नसून साहित्य, समाजसेवा आणि अथक परिश्रम यांच्या गौरवाचा सोहळा आहे. सीए शंकर अंदानी यांनी केलेले कार्य पाहिले तर त्यामागे अपार मेहनत, निष्ठा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी स्पष्टपणे दिसून येते. एकाच दिवशी १०४ पुस्तके प्रकाशित करणे, हजारो कविता लिहिणे, शेकडो कवींच्या रचनांचे संकलन करणे आणि साहित्य क्षेत्रात पाच जागतिक विक्रम प्रस्थापित करणे हे अत्यंत दुर्मिळ आणि अभिमानास्पद कार्य आहे. हे केवळ संख्येचे यश नाही, तर साहित्य संवर्धनाची एक मोठी चळवळ आहे. विशेष म्हणजे त्यांनी आई, वडील आणि बहिण यांसारख्या भारतीय संस्कृतीतील पवित्र नात्यांवर आधारित काव्यसंग्रह प्रकाशित करून समाजाला संस्कारमूल्यांची आठवण करून दिली आहे. साहित्याच्या माध्यमातून कुटुंबव्यवस्था, मानवी मूल्ये आणि सामाजिक ऐक्य जपण्याचा आणि संस्कार रुजविण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांनी देखील सीए अंदानी यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

सीए अंदानी हे केवळ साहित्यिकच नव्हे तर सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही ओळखले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी मंदिरे, मस्जिदी, चर्च, धर्मशाळा आणि विविध सामाजिक संस्थांसाठी अत्यल्प मानधनात किंवा विनामूल्य लेखा व करसल्लागार सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. २०२२ मध्ये ३६४ धार्मिक व सामाजिक संस्थांचे आर्थिक व करसल्लागार कामकाज केल्याबद्दल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने त्यांची स्वतंत्र विक्रम नोंद केली होती. त्यांच्या सामाजिक आणि व्यावसायिक योगदानाची दखल घेत अमेरिका येथील विविध संस्थांकडून त्यांना 'मेडल ऑफ एक्सलन्स'सह अनेक आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले आहेत. आतापर्यंत त्यांना सुमारे ३१८० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले असून ११५ जागतिक विक्रमांची नोंद आणि १५० मानद डॉक्टरेट पदव्यांचा बहुमान त्यांना मिळाल्याचे सांगण्यात आले.

व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट असलेले सीए शंकर अंदानी यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथे तब्बल १८ वर्षे करसल्लागार म्हणून सेवा बजावली आहे. तसेच अहिल्यानगर महानगरपालिकेसह विविध शासकीय संस्था, बँका, पतसंस्था आणि सामाजिक संस्थांचे लेखापरीक्षक व करसल्लागार म्हणून ते कार्यरत आहेत.



वंडर किड्स प्री स्कूलमध्ये नवागत चिमुकल्यांचे औक्षण करत जल्लोषात स्वागत करण्यात आले.

# भुईकोट किल्ल्यावर वटवृक्षाची केली लागवड

### पर्यावरण दिनानिमित्त हरियालीचा उपक्रम

नगर – हरियाली संस्थेच्या वतीने अहिल्यानगर येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या बाहेरील बाजूस वड, उंबर, पिंपळ या देशी आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या व सदैव ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांची लागवड करून जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

वाढते तापमान आणि प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी तसेच भरपूर प्रमाणात ऑक्सिजन निर्मिती व्हावी या दृष्टीने यावर्षी हरियाली संस्थेच्या वतीने व्यापक स्वरूपात वृक्ष लागवड करुन संवर्धन करण्यात येणार असून यामध्ये प्रामुख्याने देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अहिल्यानगर येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या परिसरात वड, उंबर, पिंपळ यांच्या रोपांची लागवड करून करण्यात आला.

यावेळी हरीयाली संस्थेचे अध्यक्ष सुरेश खामकर, एलसीबीचे गणेश लबडे, अजित आरू, जालिंदर बोरुडे, महेश गोंढाळ, संदीप शिंगवी, सागर काबरा, ठाकूरदास परदेशी, तुळशीराम पालीवाल, मनीष कुटे आदी नागरिकांनी वृक्ष लागवड मोहिमेत सहभाग घेतला.

# चेक अनादर प्रकरणी आरोपीस कारावास

नगर – कर्जाच्या थकबाकी पोटी दिलेला धनादेश वटला नसल्या प्रकरणी न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत दंड व कारावासाची शिक्षा सुनावली. याबाबत माहिती अशी की केडगाव येथील कल्पतरू बहुउद्देशीय सहकारी पतसंस्थेकडून प्रवीण राजू शेंडगे यांनी कर्ज घेतले होते. कर्जाच्या थकबाकी पोटी त्यांनी संस्थेला दिलेला धनादेश बँकेत सादर केला नंतर अपुरा निधी असल्याने अनादरीत होऊन परत आला. त्यानंतर पतसंस्थेने आरोपीविरुद्ध चलनक्षम लिखित अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये न्यायालयात दावा दाखल केला होता. प्रकरणाची सुनावणी मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रमांक सहा येथे झाली. उपलब्ध पुरावे साक्षी व नोंदीचा विचार करून न्यायालयाने आरोपीस दोषी ठरविले. न्यायालयाने आरोपीस दोन लाख दहा हजार रुपये दंड व एक महिन्याचा कारावासाची शिक्षा सुनावली तसेच दंडाची रक्कम न भरल्यास एक महिन्याचा अतिरिक्त कारावास भोगाव लागेल असे आदेश दिले. दंडाची रक्कम फिर्यादी संस्थेस नुकसान भरपाई म्हणून देण्याची हे न्यायालयाने नमूद केले या प्रकरणात फिर्यादी संस्थेच्या वतीने ॲड.अमोल बनकर व ॲड. आशिष शिंदे यांनी काम पाहिले. ॲड. आर. यु. बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. साक्षीदार अशोक तांबे यांची साक्ष या प्रकरणात महत्त्वाची ठरली.





स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने 'कॅरीबॅगशी नाते तोडा, पर्यावरणाशी नाते जोडा' या संदेशाखाली प्लास्टिकमुक्ती जनजागृती अभियान राबविण्यात येणार असून त्यासंबंधी पोस्टरचे अनावरण करताना महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उद्योजक अमोल गाडे. शेजारील छायाचित्रात छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी.

# कॅरीबॅगशी नाते तोडा, पर्यावरणाशी नाते जोडा

### स्नेहबंधचे प्लास्टिकमुक्ती अभियान, पोस्टरचे अनावरण; नागरिकांना संदेश

नगर – स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक अहिल्यानगर घडविण्यासाठी प्रत्येकाने प्लास्टिकमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहन डॉ. उद्धव शिंदे यांनी केले. प्लास्टिकमुक्ती अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पर्यावरण संवर्धन आणि प्लास्टिकमुक्त समाज निर्मितीच्या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने 'कॅरीबॅगशी नाते तोडा, पर्यावरणाशी नाते जोडा' या संदेशाखाली प्लास्टिकमुक्ती जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या पोस्टरचे अनावरण पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, आमदार संग्राम जगताप, महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उद्योजक अमोल गाडे, तसेच छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी प्लास्टिकमुक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरण, मानव व प्राणीजीवनासाठी धोकादायक ठरत आहे. प्लास्टिकमुळे माती, पाणी व हवेचे प्रदूषण वाढत असून पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी किंवा पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

## वर्ल्ड इंटिरियर डे विशेष

# बदलतं इंटिरियर : पर्यावरणपूरक विचार आणि AI तंत्रज्ञानाचा सुंदर संगम









घर म्हणजे केवळ राहण्याची जागा नसते, तर ते प्रत्येकाच्या स्वप्नांचं, भावनांचं आणि जीवनशैलीचं प्रतिबिंब असतं. बदलत्या काळानुसार घरांच्या रचना, सजावट आणि वापराच्या पद्धतींमध्ये मोठे बदल होत गेले. आजच्या आधुनिक युगात इंटिरियर डिझाईन हे केवळ सौंदर्यापुरतं मर्यादित राहिलेलं नसून ते आरामदायी, पर्यावरणपूरक आणि तंत्रज्ञानाशी जोडलेलं जीवन निर्माण करण्याचं माध्यम बनलं आहे.

दरवर्षी साजरा होणारा वर्ल्ड इंटिरियर डे हा दिवस इंटिरियर क्षेत्रातील नावीन्य, सर्जनशीलता आणि बदलत्या ट्रेंड्सचा गौरव करणारा दिवस मानला जातो. यंदाच्या काळात इंटिरियर क्षेत्रामध्ये Artificial Intelligence (AI), Smart Technology आणि Eco-Friendly Design या संकल्पनांनी विशेष स्थान निर्माण केलं आहे.

**पर्यावरणपूरक इंटिरियरची वाढती गरज :**

आज जगभरात पर्यावरण संवर्धन हा अत्यंत महत्त्वाचा विषय बनला आहे. वाढतं प्रदूषण, तापमानातील बदल आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा वाढता वापर यामुळे आता प्रत्येक क्षेत्रात Sustainable Living कडे लोकांचा कल वाढताना दिसतो. इंटिरियर डिझाईन क्षेत्रही त्याला अपवाद नाही.

आज अनेक घरांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा अधिक वापर, रिसायकल साहित्य, लाकडी टेक्स्चर, बांबू, मातीच्या वस्तू, इनडोअर प्लांट्स आणि ऊर्जा बचत करणाऱ्या वस्तूंचा वापर वाढताना दिसतो. Green Interior Design ही संकल्पना आता आधुनिक घरांचा महत्त्वाचा भाग बनली आहे.

पूर्वी घर सुंदर दिसावं यासाठी केवळ महागडी सजावट केली जायची, पण आता घर आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक असावं यालाही तेवढंच महत्त्व दिलं जात आहे. घरामध्ये नैसर्गिक हवा, शांत रंगसंगती आणि हरित वातावरण माणसाच्या मानसिक आरोग्यासाठीही फायदेशीर ठरत आहे.

AI मुळे बदलतंय इंटिरियरचं जग :

Artificial Intelligence मुळे इंटिरियर डिझाईन क्षेत्र अधिक वेगवान, अचूक आणि क्रिएटिव्ह बनलं आहे. पूर्वी एखाद्या घराचा संपूर्ण डिझाईन प्लॅन तयार करण्यासाठी खूप वेळ लागत असे. आता ख आधारित सॉफ्टवेअरच्या मदतीने काही मिनिटांत 3D डिझाईन, रंगसंगती, फर्निचर प्लेसमेंट आणि प्रकाशयोजना तयार केली जाते. ग्राहक आता Virtual Reality आणि AI Visualization च्या मदतीने आपलं घर तयार होण्याआधीच त्याचा अनुभव घेऊ शकतात. त्यामुळे डिझाईनमध्ये बदल करणे अधिक सोपं झालं आहे. Smart Homes ही संकल्पना आता मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होत आहे. Voice Control Systems, Smart Lighting, Motion Sensors, utomated Curtains, Smart Security आणि AI आधारित Temperature Control यामुळे घर अधिक आधुनिक आणि आरामदायी बनत आहे.

आजच्या तरुण पिढीला Minimal आणि Functional Design अधिक आवडत आहे. कमी जागेत अधिक उपयोगी आणि आकर्षक डिझाईन तयार करण्यासाठी AI मोठी मदत करत आहे. छोट्या घरांनाही स्मार्ट आणि आलिशान लुक देण्याचं काम आधुनिक इंटिरियर करत आहे.

**इंटिरियर म्हणजे जीवनशैली :**

इंटिरियर डिझाईन हे केवळ सजावट नसून ती एक जीवनशैली आहे. घरामध्ये वापरलेले रंग, प्रकाश, फर्निचर आणि जागेचं नियोजन थेट माणसाच्या मनःस्थितीवर परिणाम करतं. शांत आणि व्यवस्थित घर सकारात्मक ऊर्जा निर्माण करतं.

आज लोकांना फक्त सुंदर घर नको आहे, तर त्यांना Feel Good Space हवी आहे. कामाचा ताण, शहरातील धावपळ आणि डिजिटल जीवनशैली यामुळे घर हे शांततेचं ठिकाण बनत चाललं आहे. त्यामुळे आधुनिक इंटिरियरमध्ये Comfort आणि Mental Wellness यांनाही महत्त्व दिलं जात आहे.

**भविष्यातील इंटिरियर :**

भविष्यात इंटिरियर क्षेत्र अधिक स्मार्ट, पर्यावरणपूरक आणि वैयक्तिक गरजांनुसार बदलणारं असेल. ख मुळे डिझायनर्सना अधिक कल्पकता दाखवता येत आहे, तर ग्राहकांनाही त्यांच्या स्वप्नातील घर अधिक अचूकपणे अनुभवता येत आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झालं तरी घरामधील उबदारपणा, नात्यांची भावना आणि नैसर्गिक सौंदर्य टिकवून ठेवणं हेच खऱ्या इंटिरियरचं यश ठरणार आहे. सुंदर घर म्हणजे केवळ सजावट नव्हे तर पर्यावरण, तंत्रज्ञान आणि माणुसकी यांचा समतोल साधणारी जीवनकला आहे.



Pravin Kisanrao Padwal.
Reflection interiors
padwalpravin339@gmail.com
Cell : 9309083815.
Vipasha Apartment ,
A-4 , Sawedi, Ahilyanagar.
Bhaghyshri society C-3, Raikernagar,
Dhayri, Sinhagad road, Pune 41.

AESA
Architects, Engineers & Surveyors
Association Ahilyanagar

## 'निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या' राज्य कार्याध्यक्षपदी प्रा. महेश पाडेकर यांची नियुक्ती



नगर – 'निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ (महाराष्ट्र राज्य)' च्या राज्य कार्याध्यक्षपदी प्रा. महेश मंदा विष्णू पाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी प्रा. पाडेकर यांच्यावर विश्वास व्यक्त करताना नमूद केले की, त्यांच्या निष्ठेमुळे संस्था निश्चितच नवनवीन शिखरे गाठेल. शिक्षण आणि पर्यावरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

या निवडीबद्दल अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त वैभव पिचड, विश्वस्त गिरीजा जाधव, अध्यक्ष इंजिनिअर सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख, प्राचार्य डॉ.भास्करराव शेळके, उपप्राचार्य चांगदेव डोंगरे, पर्यवेक्षक विवेककुमार वाकचौरे, सुनील टिक्कल, डॉ.अनिल धिवर, मुख्यध्यापक संघटना कार्याध्यक्ष विलास सावंत, अजित जगधने, शिक्षक भारती संघटना पदाधिकारी, सदस्य आदींनी अभिनंदन केले.

## मन चोखा तर भक्ती चोखी आणि भक्ती चोखी तरच पांडुरंगाची प्राप्ती होत

### कीर्तनातून दिला संदेश, सनातन धर्म सभेत ह.भ.प. योगेश कुलकर्णी यांच्या नारदीय कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम

नगर – अधिक मासानिमित्तसनातन धर्मसभेअंतर्गत ह.भ.प. योगेश कुलकर्णी यांच्या नारदीय कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम उत्साहात पार पडला. कीर्तनामध्ये संत साहित्य, अभंग, नामस्मरण तसेच भक्तीमार्गाचे महत्त्व प्रभावी शब्दांत मांडण्यात आले.

यावेळी संत चोखामेळा यांच्या जीवनावरील आख्यान अत्यंत प्रभावीपणे सादर करण्यात आले. मन चोखा तर भक्ती चोखी आणि भक्ती चोखी तरच पांडुरंगाची प्राप्ती होते, असा संदेश कीर्तनातून देण्यात आला. संतांच्या भक्तीमधील समर्पण, निस्सीम श्रद्धा आणि समतेचा विचार यांचे महत्त्व उपस्थितांना पटवून देण्यात आले.



अधिक मासानिमित्त सनातन धर्मसभेअंतर्गत ह.भ.प. योगेश कुलकर्णी यांच्या नारदीय कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम पार पडला. यावेळी पसायदान ची प्रतिमा भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

गोविंद गोविंद मना लागलिया छंदा, आनंदले मने प्रेमे पाझरती लोचन यांसारख्या अभंगांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. तसेच रामनाम, विठ्ठलभक्ती आणि सदाचार यांचे महत्त्व कीर्तनातून स्पष्ट करण्यात आले.

अधिक मासानिमित्तसनातन धर्मसभेअंतर्गत ह.भ.प. योगेश कुलकर्णी यांच्या नारदीय कीर्तयाप्रसंगीपसायदानाची प्रतिमा भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास निळकंठ देशमुख, दिनकर देशमुख, उमेश नगरकर, उमेश वाळुंजकर, राजू नगरकर, रमेश देशपांडे, धर्माधिकारी आदी उपस्थित होते.



अधिक मासानिमित्त सनातन धर्म सभा येथे ह.भ.प. निळकंठ देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

## माऊलींच्या संजीवन समाधीचे वर्णन म्हणजे 'भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचा' दिव्य संगम

### ह.भ.प. निळकंठ देशमुख यांचे प्रतिपादन; अधिक मासानिमित्त सनातन धर्म सभा

नगर – अधिक मासानिमित्त सुरू असलेल्या सनातन धर्म सभेमध्ये ह.भ.प. निळकंठ देशमुख यांनी माऊली संजीवन समाधी सोहळा या विषयावर केलेल्या हृदयस्पर्शी प्रवचनाने उपस्थित भाविकांना संतसाहित्य, भक्ती आणि अध्यात्माच्या अद्भुत विश्वाची अनुभूती दिली. माऊलींच्या संजीवन समाधीचे वर्णन करताना त्यांनी संत नामदेव महाराजांच्या गाथेतील दाखल्यांच्या आधारे समाधी सोहळ्याचा दिव्य आणि अलौकिक प्रसंग उलगडून सांगितला. प्रवचनात त्यांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी स्वतः पांडुरंग परमात्मा, विविध ऋषी – मुनी, संत–महात्मे आणि देवगण उपस्थित होते. त्या दिव्य सोहळ्याच्या स्वागतासाठी विश्वकर्म्याने संपूर्ण अलंकापुरी नगरी चंदनाच्या कमानींनी सजविली होती. सुगंधी फुले, विविध वेलींनी नटलेली नगरी विलक्षण तेजाने उजळून निघाली होती. अलंकापुरीतील प्रत्येक कण भक्ती आणि चैतन्याने भारलेला होता.

समाधी सोहळ्याच्या दिवशी माऊलींचे परमभक्त संत चांगदेव महाराज यांनी माऊलींची पाद्यपूजा केली. एकादशीच्या दिवशी माऊलींचे अखेरचे प्रवचन झाले. त्या प्रवचनात त्यांनी सद्गुरूंचे महात्म्य, अध्यात्मातील गुरुतत्त्वाचे स्थान आणि मानवकल्याणाचा संदेश देणाऱ्या पसायदानाचे स्मरण करून दिले. माऊलींच्या प्रत्येक शब्दातून करुणा, ज्ञान आणि विश्वकल्याणाची भावना प्रकट होत होती.

यानंतर रात्री संत नामदेव महाराजांचे कीर्तन झाले. कीर्तनातून भक्तीचा महासागर उसळला आणि संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला. द्वादशीला पारणे झाल्यानंतर माऊलींनी संजीवन समाधी स्वीकारून हा अद्वितीय समाधी सोहळा पूर्णत्वास नेला. त्या वेळी स्वर्गातून पुष्पवृष्टी झाल्याचे वर्णन संत नामदेव महाराजांनी आपल्या गाथेत केले असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

माऊली समाधीत जात असताना उपस्थित संत, महात्मे आणि भक्तगणांच्या मनात अपरंपार दुःख दाटून आले होते. मात्र स्वतः माऊली पूर्णपणे शांत, स्थिर आणि निर्विकार अवस्थेत होते. संसाराच्या पलीकडील आत्मज्ञानाची सर्वोच्च अवस्था त्यांनी त्या प्रसंगी जगासमोर ठेवली. आजही माऊलींच्या समाधीचे वर्णन वाचताना आणि ऐकताना भाविकांचे अंतःकरण हेलावून जाते, असे त्यांनी नमूद केले.

देशमुख यांनी पुढे सांगितले की, या सर्व घटनांचे सविस्तर आणि जिवंत वर्णन संत नामदेव महाराजांनी आपल्या गाथेत जतन करून ठेवले आहे. त्यामुळे सुमारे सातशेहून अधिक वर्षांनंतरही भक्तांना त्या दिव्य सोहळ्याचा अनुभव शब्दांमधून घेता येतो. संत नामदेवांनी केलेल्या या वर्णनामुळे माऊलींच्या समाधी सोहळ्याचे चैतन्य आजही जिवंत असल्याची अनुभूती भाविकांना मिळते.

प्रवचनादरम्यान माऊलींच्या संजीवन समाधीमागील तत्त्वज्ञान, गुरुपरंपरेचे महत्त्व, भावदीपिकेतील विचार आणि भक्तीमार्गाचे विवेचन अत्यंत ओघवत्या शैलीत करण्यात आले. त्यामुळे उपस्थित श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमास उमेश नगरकर, निसळशास्त्री, उमेश वाळुंजकर, निलेश धर्माधिकारी, डॉ. दिनकर देशमुख (मुंबई), गावडे प्रदीप, हेमंत देशमुख तसेच गीता मंडळाच्या भगिनी उपस्थित होत्या.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## प्रस्थापित संस्कृतीला विरोध करणाऱ्यांना आज राष्ट्रद्रोही–देशद्रोही ठरवले जात आहे

### जगदीश काबरे यांचे प्रतिपादन

नगर – वैदिक काळापासून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम आपल्याकडे सुरू झालेले आहे. त्याला वैदिक संस्कृती मधल्या कर्म करणाऱ्यांनी विरोध निर्माण केला, तो आज ही सूरु असून प्रस्थापित संस्कृतीला विरोध करणाऱ्यांना आणि व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्यांना राष्ट्रद्रोही–देशद्रोही ठरवले जात असल्याचे भाष्य विवेकवादी विचारवंत जगदीश काबरे यांनी केले.

नगर शहरातील बडीसाजन मंगल कार्यालयात शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विवेक जागर संस्था आयोजित तीन दिवशीय विस्तारित राज्य कार्यकारीणीच्या बैठकीला ५ जून पासून सुरुवात झाली. विवेकवादी लेखक जगदीश काबरे यांच्या हस्ते या राज्यस्तरीय बैठकीचा शुभारंभ झाला.







नगर शहरातील बडीसाजन मंगल कार्यालयात शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विवेक जागर संस्था आयोजित तीन दिवशीय विस्तारित राज्य कार्यकारीणीच्या बैठकीला ५ जून पासून सुरुवात झाली. विवेकवादी लेखक जगदीश काबरे यांच्या हस्ते या राज्यस्तरीय बैठकीचा शुभारंभ झाला.

### महाअंनिसच्या तीन दिवशीय विस्तारित राज्य कार्यकारीणीच्या बैठकीला प्रारंभ

महा.अंनिसचे राज्य निमंत्रित कॉ.बाबा आरगडे(नेवासा), राज्य कार्यवाह ॲड.रंजना गवांदे(संगमनेर), राज्य अध्यक्ष माधव बावगे (लातूर), राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे (सांगली), राज्य प्रधान सचिव ठकसेन गोराणे (नाशिक), गजेंद्र सुरकार(वर्धा), विनायक सावळे

(शहादा), रूकसाना मुल्ला (लातूर), विजय परब (मुंबई), राज्य सरचिटणीस शहाजी भोसले (छत्रपती संभाजीनगर), सुधाकर काशीद (सोलापूर), कृष्णात स्वाती (कोल्हापूर), आरती नाईक (पनवेल), उत्तरेश्वर बिराजदार (लातूर), सुरेश बोरसे (धुळे), विलास निंबोरकर (गडचिरोली), प्रकाशन विभाग राज्य कार्यवाह मच्छिंद्रनाथ मुंडे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बुधवंत, कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, उपाध्यक्ष प्रमोद भारुळे व डॉ.प्रकाश गरुड, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व देवदत्त साळवे, सोशल मिडिया कार्यवाह सुखदेव फुलारी, कायदे विषयक सल्लागार ॲड. अभय राजे, बुवाबाजी संघर्ष सचिव प्रा.शशिकांत गायकवाड, जात पंचायत सचिव कारभारी गायकवाड, संविधान जागर सचिव दिपक शिरसाठ, विविध उपक्रम विभाग सचिव बी.के.चव्हाण, महिला सहभाग कार्यवाह छाया बंगाळ, निधी संकलन विभाग सचिव प्रा.अशोक गवांदे, जिल्हा कार्यवाह सांस्कृतिक विभाग कार्यवाह मल्हारी खेडकर, नगर शहराध्यक्ष भारतभूषण भागवत, शहर कार्याध्यक्ष विनायक ताकपेरे, नेवासा अध्यक्ष कॉ.अप्पासाहेब वाबळे, बबनराव धावणे, चिमाजी धनवडे, अनिता सापा आदि व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री.काबरे पुढे म्हणाले की, चार्वाकने पारंपारिक धर्म, वेद, आणि कर्मकांड यांना थेट आव्हान दिले. त्यांने पंचइंद्रियांनी जे जे अनुभवले त्यालाच प्रत्यक्ष प्रमाण मानले, म्हणून चार्वाकचा छळ झाला. सत्ताधारी कितीही प्रबळ असला तरीही आपण प्रश्न विचारायला घाबरू नये, आपण सत्ताधाऱ्यांना तिथे चुकतील तिथे प्रश्न विचारलेच पाहिजेत आणि त्याची योग्य ती उत्तरे किंवा त्यांच्या दबाव निर्माण केला पाहिजे आणि अशा प्रकारचा दबाव निर्माण करणारी अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही एकमेव चळवळ आहे. या चळवळीत काम करणारे आपण सगळे कार्यकर्ते जेव्हा काम करतो तेंव्हा आपल्याला सुद्धा अनेक लोक प्रश्न विचारतात त्याची उत्तरे देण्यासाठी कार्यकर्त्यांनी चार्वाक समजून घ्यायला हवा.

राज्याध्यक्ष माधव बावगे म्हणाले, महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यात अंनिसचे सगळे कार्यकर्ते हे कर्तव्य भावनेने काम करत आहेत. ग्राउंड लेव्हलवर काम करणारी ही एकमेव संघटना आहे. या सारख्या नावाच्या आणखी काही संघटना काम करत असतील, आमची कोणाची स्पर्धा नाही. आमची आमच्याशीच स्पर्धा आहे आणि आम्ही ती स्पर्धा कामातून दाखवत असतो. कार्यकर्ते घरातलं काम नंतर करतील, पण अगोदर चळवळीचं काम करतात. म्हणून ही संघटना ही चळवळ अतिशय लोकांच्या ओठावर आहे आणि ते नुसते शब्दांमधून नाहीतर कृतीमधून आहे.

राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यासाठी वाहून घेतलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवंगत

कॉम्रेड पी.बी.कडू पाटील, शंकरराव घुले, रामचंद्र विनायक बंगाळ, रामचंद्र तावरे, भाऊसाहेब पाठक, नागेश कुसाळे, बाळासाहेब आगळे, डॉ. मच्छिंद्र वाघ, सुनीता कुसळे, विजया भारुळे या दिवंगत कार्यकर्त्यांची आठवणींना उजाळा दिला.

विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीसाठी जिल्हा व शहर शाखेने उत्तम नियोजन केल्यामुळे केल्याबद्दल त्यांनी कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले.

कॉ.बाबा आरगडे म्हणाले, अहिल्यानगर जिल्हा सत्यशोधकी विचाराचा वारसा आहे, राज्यात सध्या बुवाबाजीचे पीक वाढल्याने चळवळ वाढवण्याची गरज असल्याचे संगीतले.

अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बुधवंत यांनी प्रास्ताविक केले.

जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांनी आभार मानले.

सकाळी ९ वाजता नोंदणी, चहा व नाश्ता, संघटनेची गाणी, १०:३० वाजता स्वागत व उद्घाटन झाले. पहिल्या सत्रात ११:३० वाजता राज्य कार्यकारणी कामकाजाचे सादरीकरण झाले. १:३० वाजता दुपारचे भोजन झाले. दुसरे सत्र दुपारी २:३० वाजता सूरु झाले. पुरस्कारार्थी कार्यकर्त्यांचे मनोगत व राज्य कार्यकारणी कामकाज सादरीकरण झाले. तिसऱ्या सत्रात सांयकाली ५ वाजता राज्य कार्यकारणी कामकाज सादरीकरण, ६ वाजता जेष्ठ संपादक कुमार केतकर यांचे भारतीय लोकशाही पुढील आव्हाने याविषयावर व्याख्यान झाले. त्यांचे हस्ते वैचारिक सत्र व पुस्तक प्रकाशन व पुरस्कार वितरण झाले. चौथे सत्रात रात्री ७:३० ते ८:३० समविचारी साथी संवाद झाला. त्यानंतर स्नेहभोजन झाले.

यावेळी राज्यभरातील ३५० हुन अधिक पदाधिकारी–कार्यकर्ते उपस्थित होते.

# निरामय

## वाढत्या उष्णतेचा त्वचेवर परिणाम




सध्या वाढत्या उष्णतेसह शहरांमध्ये वाढणारे वायुप्रदूषणही नागरिकांच्या आरोग्यास घातक ठरत आहे. तज्ज्ञांच्या मते, उष्ण हवामान आणि प्रदूषण यांचा एकत्रित परिणाम श्वसनविकारांसोबतच त्वचारोगांनाही कारणीभूत ठरत आहे. विशेषतः लहान मुले, वयोवृद्ध आणि आधीपासून ॲलर्जी किंवा दम्याचा त्रास असलेल्या व्यक्तींना याचा धोका मोठ्या प्रमाणात असतो. गरम हवा आणि प्रदूषणातील सूक्ष्म कण फुफ्फुसांमध्ये जळजळ निर्माण करतात. त्यामुळे दमा, खोकला, छातीत घरघर होणे आणि दम लागणे यांसारखी लक्षणे दिसून येतात.

हवेत असलेले सूक्ष्म धूलिकण, धूर, रासायनिक घटक आणि वाहनांमधून निघणारे वायू हे श्वसनमार्गाच्या समस्येस आमंत्रण देतात. यामुळे दमा असलेल्या रुग्णांमध्ये खोकला, श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत जडपणा अशा लक्षणांमध्ये वाढ दिसून येते. उष्णतेमुळे हवेत ओलावा आणि प्रदूषकांचे प्रमाण वाढल्याने हा त्रास अधिक तीव्र होऊ शकतो. प्रदूषणाचा परिणाम एखाद्याच्या त्वचेवरही होत असतो. गेल्या वर्षाच्या तुलनेत उन्हाळ्याची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे घरातील वातावर थंड राखण्यासाठी एसी, कुलरचा आधार घेतला जातो; मात्र अशावेळी बाहेरच्या आणि घराच्या आतील वातावरणातील झालेल्या बदलांमुळे जंतुसंसर्गाचा त्रास वाढत जातो. हवेत असलेले विषारी कण त्वचेच्या रोमछिद्रांमध्ये जाऊन अडथळा निर्माण करतात. यामुळे मुरुम येणे, त्वचेवर रॅशेस येणे, त्वचेची जळजळ वाढणे, खाज येणे आणि ॲलर्जीसारखे त्रास वाढू शकतात.

जाणून घ्या

उष्णतेमुळे घामाचे प्रमाण वाढते आणि त्यात प्रदूषणामुळे त्वचेवर जीवाणूंची वाढ होण्याची शक्यता अधिक असते. उष्णता, घाम आणि धुळीमुळे नायटा, गजकर्ण, त्वचेची ॲलर्जी, पुरळ उठणे आणि खाज सुटणे या समस्या वाढतात. अति उष्णतेमुळेदेखील त्वचा कोरडी पडते आणि त्वचेची जळजळ होते. विशेषतः शहरी भागांमध्ये राहणाऱ्या लोकांनी याबाबत अधिक सतर्क असणे गरजेचे आहे.

## सततच्या आवाजामुळे बहिरेपण




अवाढते शहरीकरण आणि त्याचबरोबर वाढलेले ट्राफिक, नव्याने सुरू असलेली बांधकामे आणि उत्सवांदरम्यान होणारा मोठा आवाज यामुळे पुण्यासारख्या शहरांमध्ये ध्वनी प्रदूषण हा दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे; परंतु या सततच्या आवाजाचा कानांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. ट्राफिकमुळे हॉर्नचा वाढता वापर, लाऊडस्पीकर, फटाके आणि बांधकाम यंत्रसामग्रीच्या मोठ्या आवाजाच्या सतत संपर्कात राहिल्याने कालांतराने श्रवणशक्ती कमकुवत होण्याचा धोका वाढतो. तज्ज्ञांच्या मते, श्रवणशक्ती कमी होणे अनेकदा हळूहळू विकसित होत असल्यामुळे सुरुवातीच्या लक्षणांकडे लोक दुर्लक्ष करतात. मोठ्या आवाजाच्या सततच्या संपर्कामुळे कानाच्या आतील नाजूक पेशींवर परिणाम होतो. या पेशी आवाज स्पष्टपणे ऐकू येण्यासाठी महत्त्वाच्या असतात; परंतु वारंवार मोठ्या आवाजाच्या संपर्कामुळे त्या खराब होऊ शकतात. वाहतुकीचा आवाज, बांधकाम यंत्रसामग्री, तसेच उत्सव किंवा कार्यक्रमांदरम्यान लाऊडस्पीकर आणि फटाक्यांच्या वापरामुळे लोक कानांच्या सहनशक्तीपेक्षा जास्त आवाजाच्या पातळीला सामोरे जातात.

आरोग्य विचार

कालांतराने या सततच्या आवाजामुळे श्रवणशक्तीवर परिणाम होऊन श्रवण क्षमता कमी होण्याची समस्या उद्भवू शकते. श्रवणशक्ती अचानक कमी होत नाही, तर ती हळूहळू कमी कमी होत जाते. अलीकडे श्रवण समस्यांसाठी रुग्णालयात उपचाराकरिता येणाऱ्या रुग्णांमध्ये सुमारे ४० टक्क्यांपर्यंत वाढ दिसून येत आहे.

## बैठ्या कामांमुळे मानसिक त्रासही!



आजच्या आधुनिक कामाच्या पद्धती आणि जीवनशैलीमुळे माणूस 'वेदना' कशा प्रकारे अनुभवतो यामध्ये मोठा बदल होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. तंत्रज्ञानाचा वाढता वापर, बसून काम करण्याची सवय आणि सततचा मानसिक ताण यामुळे वेदना केवळ शारीरिक न राहता मानसिक स्वरूपातही जाणवू लागल्या आहेत. मानसिक ताणतणावामधून आत्महत्यांचे प्रमाणही वाढत असल्याचे निम्हान्स तसेच आरोग्य विभागाच्या अहवालांमध्ये नमूद केले आहे. यासाठी प्रामुख्याने बैठी कामाची शैली असणाऱ्या तरुणांनी व्यसनांपासून दूर राहतानाच नियमित व्यायाम, चालणे तसेच पुरेशी झोप आणि खाण्यापिण्याच्या सवयी बदलण्याची आवश्यकता आहे.

जीवनशैली

अलीकडील निरीक्षणांनुसार, ऑफिसमध्ये किंवा घरातून दीर्घकाळ लॅपटॉपसमोर बसून काम करणाऱ्या लोकांमध्ये पाठदुखी, मानदुखी आणि स्नायूंच्या तक्रारी झपाट्याने वाढत आहेत. विशेष म्हणजे, या समस्या पूर्वी प्रामुख्याने वृद्धांमध्ये दिसत असताना आता तरुणांमध्येही मोठ्या प्रमाणावर आढळत आहेत. चुकीची बसण्याची पद्धत, हालचालींचा अभाव आणि स्क्रीनसमोरचा वाढलेला वेळ हे त्यामागील प्रमुख कारण मानले जात आहे. यासोबतच, डिजिटल साधनांमुळे काम आणि वैयक्तिक आयुष्य यातील सीमारेषा पुसट झाल्या आहेत. अनेक कर्मचारी कामाच्या वेळेनंतरही ईमेल, मेसेजेस किंवा कॉल्समुळे सतत 'ऑन' राहतात. यामुळे मेंदूला विश्रांती मिळत नाही आणि मानसिक ताण वाढतो. या ताणाचा थेट परिणाम शरीरावर होऊन वेदनांची तीव्रता वाढते. तज्ज्ञांच्या मते, वेदना केवळ शरीरातील दुखापतीचा परिणाम नसून ती मेंदू, भावना आणि मानसिक स्थितीशीही जोडलेली असते. दीर्घकाळ चालणाऱ्या वेदनांमुळे मेंदू सतत सतर्क अवस्थेत राहतो. त्यामुळे थकवा, चिंता आणि नैराश्य यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

## किडनी विकार लहान मुलांमध्येही!

प्रौढांप्रमाणेच लहान मुलांनाही किडनीचे (मूत्रपिंडाचे) आजार आढळून येतात. त्यामुळे पालकांनी मुलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. डोळ्यांभोवती, पायांवर किंवा घोट्यांवर सूज दिसल्यास लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वेळीच निदान आणि उपचार केल्यास मुलांचे आरोग्य सुधारू शकते.



किडनीचे काम म्हणजे रक्तातील घाण (टॉक्सिन्स) बाहेर टाकणे, शरीरातील पाण्याचे संतुलन राखणे आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवणे. किडनी नीट काम करत नसेल तर शरीरात घातक पदार्थ साचतात आणि त्याचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर होतो. मुलांमध्ये किडनीचे आजार जन्मतः असू शकतात किंवा संसर्गामुळेही होऊ शकतात.

काही सामान्य समस्या म्हणजे नेफ्रोटिक सिंड्रोम, लघवीच्या मार्गातील संसर्ग (यूटीआय), आणि ग्लोमेरुलोनेफ्रायटिस (किडनीमध्ये सूज येणे) तसेच पॉलीसिस्टिक किडनी डिसीज किंवा किडनीच्या रचनेतील दोषही कारणीभूत ठरू शकतात.

आरोग्य चर्चा

काही गंभीर प्रकरणांमध्ये किडनी पूर्णपणे काम करणे थांबवते, याला 'एंड-स्टेज किडनी डिसीज' म्हणतात. त्यामुळे सुरुवातीची लक्षणे ओळखणे खूप महत्त्वाचे आहे.

पालकांनी लक्ष द्यावीत अशी लक्षणे :

*डोळे, पाय किंवा घोट्यांभोवती सूज येणे
*लघवीचे प्रमाण कमी होणे, गडद रंगाची लघवी, लघवीवाटे रक्त येणे किंवा वारंवार लघवी होणे
*कोणतेही स्पष्ट कारण नसताना सतत ताप येणे
*भूक न लागणे आणि वाढ नीट न होणे
*सतत थकवा किंवा अशक्तपणा
*उच्च रक्तदाब (ब्लड प्रेशर वाढणे)

निदान आणि उपचार

किडनीच्या समस्या तपासण्यासाठी डॉक्टर लघवीची तपासणी, रक्त तपासणी आणि अल्ट्रासाऊंड तपासणीचा सल्ला देतील. त्यानुसार औषधे, रक्तदाब नियंत्रण आणि संसर्गावर उपचार करा.

असा घ्या आहार

*आहारातील मीठाचे प्रमाण नियंत्रित राखा.
*डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार प्रथिनांचे सेवन करा.
*प्रक्रिया केलेले (प्रोसेस्ड) पदार्थांचे सेवन टाळा.

## विषारी धातू ठरताहेत धोकादायक



जगभरात अनेक ठिकाणी माती आर्सेनिक, कॅडमियम, कोबाल्ट, क्रोमियम, कॉपर, निकेल आणि शिसे अशा विषारी धातूंनी प्रदूषित झालेली आहे. ही माहिती 'सायन्स' या मासिकातील एका अहवालात देण्यात आली आहे.

डेयी हो आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या संदर्भात संशोधन केल. त्यांनी १,४९३ प्रदेशांतील मातीच्या जवळपास आठ लाख नमुन्यांचे विश्लेषण केले. या अभ्यासानुसार, जगातील सुमारे १४ ते १७ टक्के शेतीयोग्य जमीनीत किमान एका विषारी धातूची पातळी सुरक्षिततेच्या मर्यादेपेक्षा अधिक असल्याचं आहे.

आरोग्यशास्त्र

डॉ. महेश दाळे

* जमिनीतील या प्रदूषणामुळे अन्नसुरक्षा, परिसंस्था आणि सार्वजनिक आरोग्य धोक्यात येतात. पीक उत्पादनात घट येते आणि अन्न साखळीत विषारी धातूंचा समावेश होतो. त्यामुळे किडनीचे विकार, कर्करोग, मज्जासंस्थेशी संबंधित समस्या आणि शारीरिक वाढीमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

* या धातूंनी समृद्ध पट्टा युरेशिया भागात आढळतो. हा धोकादायक भाग नैसर्गिक घटक (धातूंनी समृद्ध खडक, ज्वालामुखी क्रिया) आणि मानवी हस्तक्षेप (खनिज उत्खनन, औद्योगिकीकरण, सिंचन) यांचा एकत्रित परिणाम आहे. * हवामान आणि भूप्रदेश यांचाही धातूंच्या साठ्यांवर प्रभाव असतो. * याला आळा बसावा म्हणून अभ्यासकांनी कडक पर्यावरणीय नियमावली, सुधारित मृदा परीक्षण, शाश्वत शेती पद्धती आणि जनजागृती मोहिमेची मागणी केली आहे.

## प्रौढ वयात मूत्रमार्गाच्या संसर्गात वाढ

सध्या तापमानाचा पारा वाढत आहे. उन्हाळा तीव्र होत जातो, तशा आरोग्याच्या समस्या तोंड वर काढू लागतात. या काळात ३५ ते ५० वयोगटातील प्रौढांमध्ये मूत्रमार्गाच्या संसर्गात (यूटीआय) वाढ होण्याचं प्रमाण वाढतं. अति उष्णता, निर्जलीकरण आणि तापमानात होणारे चढउतार हे घटक या संसर्गात वाढ होण्यास कारणीभूत ठरतात. वेळीच निदान आणि उपचार केल्यास 'यूटीआय'चं व्यवस्थापन करण्यास मदत होऊ शकते.

मूत्रमार्गाचा संसर्ग हा मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशयासह मूत्रमार्गाच्या कोणत्याही भागात आढळू शकतो. लघवी करताना जळजळ होणं, फेस किंवा दुर्गंधीयुक्त लघवी होणं, वारंवार लघवी करण्याची इच्छा होणं, लघवीवाटे रक्त जाणं, ताप येणं आणि ओटीपोटात वेदना होणं ही याची लक्षणे आहेत. 'यूटीआय'वर वेळेत उपचार न केल्यास पायलोनेफ्रायटिस (किडनी संसर्ग) किंवा सेप्सिससारखी गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते. उन्हाळ्यात हा त्रास टाळायचा असेल, तर शरीर हायड्रेटेड राखणं, स्वच्छतेच्या सवयींचं पालन करणं, सुती अंतर्वस्त्रांचा वापर करणं आणि जास्त काळ लघवी रोखून न धरणं या गोष्टी कटाक्षाने पाळायला हव्यात.

उन्हाळ्यात डिहायड्रेशन होतं. त्यामुळे मूत्रमार्गाच्या संसर्गाचा धोका वाढतो. शरीरात पुरेसे द्रवपदार्थ नसतात, तेव्हा मूत्राशयातून विषारी पदार्थ आणि जीवाणू बाहेर काढता येत नाहीत. त्यामुळे संसर्ग होतो. उष्ण आणि दमट हवामान जीवाणूंच्या वाढीसाठी आदर्श वातावरण असतं. जास्त घाम येणं देखील जीवाणूंच्या वाढीस चालना देतं. 'यूटीआय'ला कारणीभूत ठरणारा सर्वात सामान्य जीवाणू म्हणजे एस्चेरिचिया कोलाई (ई. कोलाई). हा जीवाणू आतड्यांमध्ये आढळतो; परंतु तो मूत्रमार्गात गेला तर संसर्गास कारणीभूत ठरू शकतो. महिलांच्या मूत्रमार्गाची लांबी कमी असते, त्यामुळे जीवाणू मूत्राशयापर्यंत सहज पोहोचतात. म्हणून महिलांमध्ये 'यूटीआय' संसर्गाची शक्यता अधिक असते.




आरोग्य विकार

डॉ. कुंदन गायकवाड

प्रौढांमध्ये 'यूटीआय' संसर्गाचं प्रमाण ३० टक्क्यांनी वाढलं आहे. या रुग्णांच्या निदानासाठी मूत्र आणि रक्त तपासणीचा सल्ला दिला जातो. 'यूटीआय' टाळण्यासाठी, हायड्रेटेड राहणं, वेळोवेळी मूत्राशय रिकामं करणं, लघवी रोखून न ठेवणं, मूत्राशयावर परिणाम करणारे कॅफिन आणि अल्कोहोलचं सेवन कमी करणं आणि नाजूक भागाची चांगली स्वच्छता राखणं गरजेचं आहे.

## शारीरिक संबंधांविनाच गर्भधारणा!

इंस्टाग्रामवरील डॉक्टर अंकिता शहासाने यांच्या 'डॉक्टर अंकिता' चॅनलवर शेअर झालेल्या एका केस स्टडीने संपूर्ण देशभरात खळबळ माजवली आहे. या केस स्टडीत सांगितल्यानुसार १५ वर्षीय मुलगी कोणत्याही शारीरिक संबंध किंवा आयव्हीएफसारख्या वैद्यकीय मदतीशिवाय गर्भवती झाली. सामान्यतः गर्भधारणेसाठी शुक्राणू आणि स्त्रीबीज यांचा संपर्क हवा असतो; पण या प्रकरणात काहीतरी वेगळेच घडले. ही केस जगातील दुर्मिळ 'ट्रॉमा-इंड्यूस्ड प्रेग्नन्सी'पैकी एक आहे. ही बातमी वाचून वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञदेखील आश्चर्यचकित झाले आहेत.



मुलगी पोटदुखीच्या तक्रारीने रुग्णालयात दाखल झाली. कदाचित गंभीर संसर्ग झाला असेल, असे डॉक्टरांना सुरुवातीला वाटले; पण तिला प्रसूती वेदना होत असल्याचे तपासणीत समोर आले. जन्मजात तिच्या शरीरात योनीमार्गच नव्हता. म्हणजे सामान्य शारीरिक संबंध शक्यच नव्हते, तरी तिच्या गर्भाशयात पूर्ण विकसित गर्भ होता. ऑपरेशनद्वारे डॉक्टरांनी एक निरोगी बाळाला जन्म दिला. मुलगी जन्मापासून 'ॲप्लास्टिक डिस्टल व्हजायना' या स्थितीत होती, म्हणजे योनीचा शेवटचा भागच तयार नव्हता. यामुळे बाह्य मार्गाने गर्भधारणा अशक्य होती. डॉक्टरांनी 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन' आणि इतर जर्नल्समध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनाचा हवाला दिला. या प्रकरणात शुक्राणूंचा प्रवास पूर्णपणे वेगळ्या आणि अनपेक्षित मार्गाने झाला. ही स्थिती जगात फारच कमी मुलींमध्ये आढळते, तरीही गर्भधारणा झाली याचे कारण पुढे समोर आले.

गर्भधारणेच्या अगदी नऊ महिने आधी मुलगी आपल्या बॉयफ्रेंडसोबत भांडली होती. यात तिच्या पोटावर चाकूने वार झाले. त्यामुळे पोटावर छोटे-छोटे छिद्र पडले. त्याच वेळी तिने ओरल सेक्स केल्याची माहिती समोर आली. सर्वसाधारणपणे पोटातील आम्लामुळे वीर्य नष्ट होते; पण पोट रिकामे किंवा आम्ल कमी असल्याने शुक्राणू पोटातील आम्लात मेले नाहीत. लाळेच्या संरक्षणामुळे ते जिवंत राहिले आणि पोटातील छिद्रांमधून बाहेर पडले. हा अपघातच गर्भधारणेचा प्रमुख कारण ठरला. लाळेने संरक्षित शुक्राणू पोटातील छिद्रांमधून बाहेर पडून गर्भाशय, अंडाशय आणि फॅलोपियन ट्यूब्सपर्यंत पोहोचले. त्याच वेळी मुलीचे ओव्हुलेशन चालू होते, म्हणजे अंडे तयार झाले होते. शुक्राणू आणि अंडे यांचा संपर्क झाला आणि गर्भधारणा झाली. हे सर्व योगायोग एकत्र आल्यामुळे शक्य झाले. रिसर्चगेट आणि इतर वैद्यकीय जर्नल्समध्ये यासारख्या 'ओरल कॉन्सेप्शन' प्रकरणांचा उल्लेख आहे; पण ही केस त्याहूनही अधिक दुर्मिळ आहे.

अजब गजब

## विषारी धातू ठरताहेत घातक

जगभरात अनेक ठिकाणी माती आर्सेनिक, कॅडमियम, कोबाल्ट, क्रोमियम, कॉपर, निकेल आणि शिसे अशा विषारी धातूंनी प्रदूषित झालेली आहे. ही माहिती 'सायन्स' या मासिकातील एका अहवालात देण्यात आली आहे.



डेयी हो आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या संदर्भात संशोधन केल. त्यांनी १,४९३ प्रदेशांतील मातीच्या जवळपास आठ लाख नमुन्यांचे विश्लेषण केले. या अभ्यासानुसार, जगातील सुमारे १४ ते १७ टक्के शेतीयोग्य जमीनीत किमान एका विषारी धातूची पातळी सुरक्षिततेच्या मर्यादेपेक्षा अधिक असल्याचं आहे. * जमिनीतील या प्रदूषणामुळे अन्नसुरक्षा, परिसंस्था आणि सार्वजनिक आरोग्य धोक्यात येतात. पीक उत्पादनात घट येते आणि अन्न साखळीत विषारी धातूंचा समावेश होतो. त्यामुळे किडनीचे विकार, कर्करोग, मज्जासंस्थेशी संबंधित समस्या आणि शारीरिक वाढीमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

धोका प्रदूषणाचा

* हवामान आणि भूप्रदेश यांचाही धातूंच्या साठ्यांवर प्रभाव असतो. * याला आळा बसावा म्हणून अभ्यासकांनी कडक पर्यावरणीय नियमावली, सुधारित मृदा परीक्षण, शाश्वत शेती पद्धती आणि जनजागृती मोहिमेची मागणी केली आहे.

नवसंशोधन

### मेंदू असतो लहान

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन अँड टेक्नॉलॉजी हैदराबादच्या शास्त्रज्ञांनी भारतीयांच्या मेंदूचा नकाशा तयार केला आहे. हा अशाप्रकारचा पहिलावहिला नकाशा आहे. भारतीयांचा मेंदूचा आकार इतरांच्या तुलनेत लहान असल्याची बाब या संशोधनातून समोर आली आहे. पाश्चिमात्य देश तसंच पूर्वेकडच्या इतर देशांमधल्या लोकांच्या तुलनेत भारतीयांच्या मेंदूचा आकार बराच लहान असतो. या संशोधनामुळे अल्झायमर तसंच मेंदूशी संबंधित इतर विकारांवरील उपचारांना गती मिळू शकते.



दंतारोग्य

### दात पांढरेशुभ्र होतात का?

दातांचा पांढरेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रक्रिया केल्या जातात. दातांचा पिवळेपणा दूर करणाऱ्या प्रक्रियेबाबत बरेच गैरसमज आहेत. या प्रक्रियेनंतर दात पांढरेशुभ्र होतात, असा समज असतो. मात्र या प्रक्रियेचे लाभ व्यक्तीगणिक बदलत जातात. दागांचे प्रकार, दातांवरच्या एनामेलचा थर, दातांची क्षमता यावर बरंच काही अवलंबून असतं. त्यामुळे दात पूर्ण पांढरे होतीलच असं नाही.



डोळ्यांचे आरोग्य

### डोळे दुखत असतील तर...

लॅपटॉप आणि कॉम्प्युटरचा वापर केल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. डोळे दुखू लागतात. मात्र काही उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो. सतत स्क्रीनपुढे राहिल्याने डोळे दुखू लागले तर डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारावेत. योगामुळेही आराम मिळू शकतो. आहारात डाळी, हिरव्या भाज्या, गाजर यांचा समावेश असावा.



आजीबाईचा बटवा

### शिळी पोळीही आहे गुणकारी

शिळ्या किंवा उरलेल्या पोळ्यांची फोडणीची पोळी केली जाते. मात्र बऱ्याच घरांमध्ये अशा उरलेल्या पोळ्या टाकून दिल्या जातात. अर्थात या शिळ्या पोळ्या अधिक लाभदायी ठरतात. या शिळ्या पोळ्यांमध्ये विविध आजार बरे करण्याची क्षमता असते.



या पोळ्यांमध्ये ताज्या पोळ्यांच्या तुलनेत प्रथिनांचं प्रमाणही अधिक असतं. शिळ्या पोळ्यांमुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात रहाते. मधुमेहींना सकाळच्या वेळी दुधासोबत शिळी पोळी खाता येईल. शिळ्या पोळीच्या सेवनामुळे रक्तदाबही नियंत्रणात रहातो. त्यामुळे शिळी पोळी टाकून देऊ नये.

# वीज चोरी पकडणाऱ्या वायरमनने मागितली ५० हजार रुपयांची लाच

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई, ८ जूनपर्यंत पोलीस कोठडी

नगर - संगमनेर तालुक्यातील निंबाळे शिवारात वीज चोरी प्रकरणावरून हॉटेल चालकाकडे ५० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या कंत्राटी वायरमनला नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून पकडले. गणेश माधव दातीर (रा. पिंप्रीलौकी, ता. संगमनेर) असे अटक करण्यात आलेल्या लाचखोर वायरमनचे नाव आहे. या कारवाईनंतर त्याला न्यायालयात हजर केले असता, न्यायाधीश विवेक गव्हाणे यांनी आरोपीला ८ जून पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

ही कारवाई ५ जून रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास करण्यात आली. कोल्हेवाडी रोड परिसरातील एका नामांकित हॉटेलला मोठ्या प्रम ाणावर वीज पुरवठा लागतो. या हॉटेल चालकाने विजेचे पैसे वाचवण्यासाठी डीपीवरून चोरून वीज वापरण्यास सुरुवात केली होती. ही वीज चोरी कंत्राटी वायरमन गणेश दातीर याने पकडली. वीज चोरी पकडल्यानंतर दातीर याने हॉटेल चालकाला वरिष्ठ अधिकाऱ्यांची आणि मोठ्या कारवाईची भीती दाखवली. कारवाई टाळण्यासाठी हॉटेल चालकाने प्रकरण तिथेच मिटवण्याची तयारी दर्शवली. याचाच गैरफायदा घेत वायरमन दातीर याने ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली.

हॉटेल चालकाची चोरलेली वीजजोडणी आणि वायर आधीच काढून घेण्यात आली असल्याने, मग पैसे कशासाठी द्यायचे, असा विचार करून त्यांनी सुरुवातीला पैसे देण्याचे टाळले. मात्र, लाचखोर दातीर याने हॉटेल चालकाकडे पैशांसाठी वारंवार तगादा लावला. तो कधी थेट हॉटेलवर जाऊन तर कधी फोन करून सतत मानसिक त्रास देऊ लागला. दातीर याच्या या सततच्या त्रासाला आणि वाढत्या मागणीला वैतागून अखेर हॉटेल चालकाने थेट नगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रीतसर तक्रार नोंदवली.

तक्रारदाराच्या अर्जाची शहानिशा केल्यानंतर नगरच्या लाचलुचपत विभागाचे पथक ५ जून रोजी दुपारी संगमनेरात दाखल झाले. लाच मागितल्याचे स्पष्ट झाल्याने पथकाने त्याला बेड्या ठोकल्या.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. छाया देवरे, पोलीस अंमलदार सचिन सुद्रुक, गजानन गायकवाड, वैभव सुपेकर, हारून शेख यांच्या पथकाने केली आहे.

# राज्याभिषेक दिनानिमित्त मनपाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून केले अभिवादन


अहिल्यानगर मनपात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करताना महापौर ज्योतीताई गाडे. समवेत दिपालीताई बारस्कर, वर्षाताई सानप व इतर.

नगर - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या विचारांचे स्मरण करून स्वराज्याच्या आदर्शांना अभिवादन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास महापौर ज्योतीताई गाडे, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेऊन लोककल्याणकारी आणि न्यायप्रिय असे रयतेचे राज्य निर्माण केले. समाजातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविणे, महिलांचा सन्मान राखणे, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला न्याय देणे तसेच सर्व धर्मांचा आदर राखत सुशासन निर्माण करणे हा शिवरायांच्या राज्यकारभाराचा मूलमंत्र होता. त्यामुळेच आजही त्यांचे कार्य संपूर्ण जगासाठी आदर्श मानले जाते.

त्या पुढे म्हणाल्या, रायगड किल्ल्यावर पार पडलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा हा केवळ एका राजाचा राज्याभिषेक नव्हता, तर तो मराठी माणसाच्या स्वाभिमानाचा, आत्मसन्मानाचा आणि स्वातंत्र्याच्या विचारांचा विजय होता. राज्याभिषेकामुळे मराठी अस्मितेला नवे बळ मिळाले आणि स्वराज्याची संकल्पना अधिक मजबूत झाली. शिवरायांनी उभे केलेले स्वराज्य हे न्याय, समानता, शौर्य आणि लोकहित या मूल्यांवर आधारित होते. त्यामुळे त्यांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून समाजाला नवी दिशा देणारे आहे.

यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर यांनी राज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा देताना छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांच्या सन्मानासाठी घेतलेल्या भूमिकेचे स्मरण केले. त्यांच्या राज्यकारभारातील लोककल्याणकारी निर्णय आजही प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

उपसभापती वर्षाताई सानप यांनी देखील राज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा देत शिवरायांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान आणि स्वराज्याच्या स्थापनेसाठी केलेला संघर्ष याचे स्मरण केले. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देणारे राज्य निर्माण करण्याची शिकवण शिवरायांच्या कार्यातून मिळते, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात अभिवादन केले.

# लोक अंधश्रद्धाळू राहिले तरच सत्ता भोगता येईल

## ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री कुमार केतकर यांचे मत


ज्येष्ठ पत्रकार खासदार पद्मश्री कुमार केतकर यांची मुलाखत घेताना सुहासभाई मुळे.

नगर - मध्यमवर्गीय लोकांमध्ये अंधश्रद्धेचे प्रमाण खूप जास्त आहे आणि ते अधिक वाढवण्याचे काम सध्याचे मोदी सरकार आणि आरएसएस पद्धतशीरपणे प्रशासन, मीडिया आणि सार्वजनिक कार्यक्रम यांच्या माध्यमातून करत आहे. कारण या मध्यमवर्गीयांचे प्रमाण ६० ते ७० टक्के असल्यामुळे हे लोक अंधश्रद्धाळू राहिले तरच आपल्याला अखंड सत्ता उपभोगता येईल, हे या सरकारने ओळखलेले आहे, असे मत माजी खासदार व ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री कुमार केतकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विवेक जागर संस्था आयोजित कार्यक्रमासाठी कुमार केतकर अहिल्यानगर येथे आले असता सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी कुमार केतकर यांची दै. नवा मराठासाठी मुलाखत घेतली. या मुलाखतीत कुमार केतकर यांनी विविध विषयांवर परखड मत व्यक्त केले. ते जगामध्ये आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान याबाबत कितीही विकास होत असला तरी रेल्वेच्या रुळाप्रमाणे दुसरा समांतर रूळ अंधश्रद्धेचाही तेवढाच वाढत चाललेला आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अशोक खरात प्रकरणावर बोलताना ते म्हणाले, सुशिक्षित स्त्रियांबरोबर पुरुषदेखील आणि मुख्य म्हणजे मोठमोठे राजकारणी व मंत्री देखील त्यांच्या दरबारात न चुकता हजेरी लावून जेव्हा अशा थोतांड बुवाबाजीची पाठराखण करतात, त्यापेक्षा मोठे दुर्दैव असू शकत नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

मध्यवर्गीयांमध्ये असलेली अंधश्रद्धा ही शेकडो वर्षांपासून चालत आलेली आहे. त्यावेळी तर मोदी सरकार आणि आरएसएस नव्हते. त्यावेळी ही अंधश्रद्धा कोण पसरवत होते, असा प्रश्न विचारला असता केतकर म्हणाले, काळानुसार विकास होत गेला असे म्हणले तरी, विज्ञान-तंत्रज्ञान शिक्षण आणि एकंदर सामाजिक व्यवस्था याचा दर्जा टिकवणे, चुकीच्या गोष्टींचा, घातक रूढी परंपरांचा नायनाट करणे, सरकारच्या इच्छाशक्तीवर अवलंबून असते. सत्ताधारी असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी करोना काळात जेव्हा थाळ्या वाजवायला सांगतात किंवा लाईट बंद करून करोना जाओ.. अशा घोषणा द्यायला सांगतात त्या हास्यास्पद वाटतात. आणि मुख्य म्हणजे असे जो करणार नाही तो देशद्रोही आहे, असे वातावरण निर्माण केले जाते. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की अतिशय उच्चशिक्षित आणि परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांमध्ये देखील याचे प्रमाण वाढल्यामुळे काही पाश्चात्य देशांमध्ये तेथील संसदेत याविषयी तक्रारी दाखल झाल्या आहेत. आज वेगवेगळ्या सरकारी अजेंड्यामधून कार्यक्रमांमधून धार्मिक उत्सवांमधून अंधश्रद्धेची सरकार मान्य नियोजित षडयंत्रामार्फत पेरणी केली जाते आहे, निव्वळ व्यक्तीपूजा ही अंधश्रद्धेपेक्षाही घातक गोष्ट या लोकशाहीला ठरत आहे. ही अतिशय चुकीची गोष्ट आहे, अशी खंत कुमार केतकर यांनी व्यक्त केली.

दरम्यान वेगवेगळ्या देवदेवता, धर्म, रूढी-परंपरा याविषयी असलेल्या अंधश्रद्धेपेक्षाही जास्त आज राजकारणी नेते, गुन्हेगार आणि घराणेशाहीनुसार आमदार, खासदार, महापौर, बँकेचे चेअरमन सगळे एकाच घरातले, सगळे एकमेकांच्या पाहुण्याचे मेव्हणे आणि मेव्हण्याचे पाहुणे, हे केवळ त्यांना मतपत्रिकेतून निवडून देणाऱ्या मतदारांच्या व्यक्ती पूजेच्या अंधश्रद्धेमधूनच निर्माण होतात. त्यातून लोकशाही नव्हे तर राजेशाही आणि संस्थानं निर्माण झालेली आहेत. व्यक्तीपूजा अंधश्रद्धा हीच लोकशाहीपुढील खरे आव्हान आहे. याचा नायनाट करणे आवश्यक आहे आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीने यावर अधिक मतप्रदर्शन करून जागृती करण्याची आवश्यकता आहे, असे मत हितगुज संवादामध्ये सुहासभाई मुळे यांनी व्यक्त केले.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आरगडे, माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, अनिसच्या राज्य कार्यवाह ॲड. रंजना गवांदे, माधव बावगे, संजय बनसोडे, बाबासाहेब बुधवंत, सुखदेव फुलारी, विष्णू गायकवाड, प्रमोद भारुडे, डॉ. प्रकाश गरुड, विनायक सापा, देवदत्त साळवे, भारत भूषण भागवत, आदी उपस्थित होते.


कल्याण रोड परिसरात पोलीसांनी रात्रीची गस्त वाढवावी या मागणीचे निवेदन तोफखाना पोलिसांना देताना नागरिक.

# कल्याण रोड परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट, रात्रीची गस्त वाढविण्याची नागरिकांची मागणी

नगर -कल्याण रोड परिसरातील गणेश नगर भागात ५ जून रोजी पहाटेच्या २.३० वाजण्याच्या दरम्यान स्वप्निल अंकम यांच्या घरी चार चोर आले होते.परंतु अंकम यांच्या सतर्कतेमुळे व आरडा ओरडा केल्यामुळे ते चोर पळून गेले. चोरट्यांनी पळून जाताना दगडफेक केली.या घटनेचे व्हिडिओ तोफखाना पोलीस स्टेशन येथे देण्यात आले आहेत.

या चोरट्यामूळे गणेशनगर,कल्याणरोड, विठ्ठल रुक्मीणी मंदीरासमोरील भाग या सर्व परिसरात मोठे भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे.परिसरातील लोकांच्या जिवीतास भय निर्माण झाले आहे. सदरील परिसरात पोलीसांची गस्त होत नाही. तरी गणेशनगर परिसरात पोलीसांनी पेट्रोलींग गस्त वाढवावी यावी. तसेच सदर परिसरात अनेक वेळा छोटया मोठ्या चोऱ्या झालेले आहेत. तरी या ठिकाणी आलेल्या चोरांचा लवकरात लवकर शोध घेवुन योग्य तो बंदोबस्त करावा. याबाबतचे निवेदन गणेशनगर येथील नागरिकांच्या वतीने देण्यात आले. याप्रसंगी गणेशनगर सोसायटीचे चेअरमन गणेश शिंदे, स्वप्निल अंकम, अमोल भांबरकर, नरेश श्रीपत, मनोहर संदुपटला, योगेश दिवाने, शंकर गायकवाड, अंबादास दोंता, अर्जुन नेवसे, राहुल शर्मा आदी उपस्थित होते.

# महागाईच्या कात्रीत सलून व्यवसाय; सेवादरात २० टक्के वाढ

नगर - समाजाचा अविभाज्य घटक असलेला नाभिक समाज सध्या महागाईच्या कात्रीत सापडला आहे. वाढत्या आर्थिक मंदीचा व महागाईचा फटका सलून व्यवसायाला बसला असून, अखेर महाराष्ट्र नाभिक महामंडळाने राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील सलून सेवांच्या दरामध्ये २० टक्क्यांची दरवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ ६ जून २०२६ पासून लागू झाली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे इंधन दरात वाढ झाली आहे. याचा थेट परिणाम सलून व्यवसायासाठी लागणाऱ्या आवश्यक साहित्यावर झाला आहे. शॅम्पू, हेअर कलर, ब्लीच, फेशियल क्रीम, जेल, वॅक्स यांसारख्या वस्तूंच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. लॉरियल, वेला, श्वार्झकॉफ आणि गोदरेज यांसारख्या नामांकित कंपन्यांच्या उत्पादनांचे भाव वाढल्याने व्यावसायिक अडचणीत आले आहेत. आतापर्यंत ग्राहकांचा विचार करून व्यावसायिकांनी स्वतःचा नफा कमी ठेवून सेवा सुरू ठेवल्या होत्या, मात्र आता जुन्या दरात व्यवसाय चालवणे अशक्य झाले आहे. हा निर्णय केवळ दरवाढ नसून, राज्यातील हजारो सलून व्यावसायिक आणि त्यांच्या कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न असल्याचे महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे राज्याध्यक्ष सयाजी झुंजार यांनी स्पष्ट केले.

सलून व्यावसायिक केवळ सेवा देत नाहीत, तर त्यांच्यावर कुटुंबाचे पालनपोषण, मुलांचे शिक्षण, दुकानभाडे, वीजबिल, कर्जाचे हप्ते अशा अनेक आर्थिक जबाबदाऱ्या आहेत. वाढत्या व्याजदरामुळे बँकांच्या कर्जाचे हप्तेही वाढले आहेत. प्रदेश कोषाध्यक्ष रामदास पवार यांनी सांगितले की, ग्रामीण भागात तर परिस्थिती अधिक बिकट असून, अनेक नाभिक कुटुंबांचा हा एकमेव उत्पन्नाचा स्रोत आहे. प्रदेश उपाध्यक्ष विष्णू वखरे यांनी सांगितले की, दुकानाचे आधुनिकीकरण करण्यासाठी घेतलेल्या कर्जामुळे वाढलेला आर्थिक ताण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर यामुळे व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे.

नाभिक समाज हा सुख-दुःखात समाजाच्या पाठीशी उभा राहणारा घटक आहे. आज हीच वेळ त्या समाजावर आली आहे. ग्राहकांनी या दरवाढीकडे केवळ पैशांच्या नजरेतून न पाहता, हजारो मेहनतकऱ्यांच्या जगण्याशी जोडलेला प्रश्न म्हणून पाहावे आणि या निर्णयाला सकारात्मक सहकार्य द्यावे, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या दरवाढीच्या निर्णयाचे समर्थन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे पदाधिकारी सयाजी झुंजार (राज्याध्यक्ष), विष्णू वखरे (उपाध्यक्ष), श्याम आस्करकर (कार्याध्यक्ष), घनश्याम वाघ (सरचिटणीस), रामदास पवार (कोषाध्यक्ष) आणि विकास मदने (चिटणीस) यांनी केले आहे.

# नगरमध्ये सलग दोन दिवस वाहने पेटवली

## कुलकर्णी कुटुंबावर जीवघेणा हल्ल्याचा संशय?


जळीत कारची पाहणी करताना आ. संग्राम जगताप व इतर.

नगर - शहराच्या मध्यवर्ती भागातील शनी चौक परिसरातील गुजर गल्लीत सलग दुसऱ्या दिवशी वाहने पेटविण्याचा प्रकार घडला आहे. गौरव विनायक कुलकर्णी यांच्या घरासमोर उभ्या असलेल्या दोन आलिशान चारचाकी वाहनांना आग लावून ती जाळून खाक केल्यानंतर, पुन्हा त्यांच्याच दुचाकीला आग लावण्याचा प्रयत्न झाला. हा प्रकार अपघाती नसून कुलकर्णी कुटुंबावर पूर्वनियोजित घातपात असल्याचा संशय बळावला असून, या प्रकरणात तीन संशयित सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाले आहेत. या आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आ. संग्राम जगताप यांनी केली आहे.

४ जून रोजी रात्री सुमारे २:३० वाजण्याच्या सुमारास गौरव कुलकर्णी यांच्या घराबाहेर उभ्या असलेल्या महिंद्रा आणि ह्युंदाई एक्स्टर या दोन गाड्यांना अज्ञात व्यक्तींनी आग लावली. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले आणि दोन्ही वाहने पूर्णतः जळून खाक झाली. ही आग विझत नाही तोच, पुन्हा ५ जून रोजी मध्यरात्री त्याच ठिकाणी उभ्या असलेल्या दुचाकीला पेटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे हा प्रकार थेट कुलकर्णी कुटुंबाला लक्ष्य करून करण्यात आलेल्या हल्ल्याचा भाग असावा, अशी दाट शक्यता वर्तवली जात आहे.

या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, त्यात तीन संशयित व्यक्ती वाहनांच्या परिसरात संशयास्पद हालचाली करताना दिसत आहेत. या पुराव्यांच्या आधारे पोलीस आरोपींचा कसून शोध घेत आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून आ. संग्राम जगताप यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. कुलकर्णी कुटुंबाची भेट घेऊन त्यांना धीर दिला. तसेच, पोलीस प्रशासनाशी चर्चा करत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. आ. जगताप म्हणाले की, अशा समाजविघातक प्रवृत्तींना वेळीच ठेचले पाहिजे. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असून, पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तात्काळ आरोपींचा शोध घेऊन त्यांना जेरबंद करावे. कायद्याचा धाक निर्माण करणे गरजेचे आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक युद्धपातळीवर तपास करत आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा मागोवा घेतला जात असून, लवकरच आरोपींना बेड्या ठोकल्या जातील, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. सलग दोन दिवसांच्या या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, आरोपींना शासन करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

# शिखर चातुर्मासच्या तयारीला प्रारंभ; आनंद तीर्थ-समवशरण येथे क्षेत्र विशुद्धी समारंभ


महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषि म. सा यांच्या सानिध्यात उपाध्याय प्रवीणऋषी म.सा. यांचा २०२६ मध्ये होणारा भव्य समर्पण - सर्व कल्याण शिखर चातुर्मास सोहळ्याच्या तयारीचा शुभारंभ आनंदधाम परिसरात उत्साहात करण्यात आला.

नगर - महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषि म. सा यांच्या सानिध्यात उपाध्याय प्रवीणऋषी म.सा. यांचा २०२६ मध्ये होणारा भव्य समर्पण - सर्व कल्याण शिखर चातुर्मास सोहळ्याच्या तयारीचा शुभारंभ आनंदधाम परिसरात उत्साहात करण्यात आला. चातुर्मासासाठी उभारण्यात येणाऱ्या आनंद तीर्थ-समवशरण या मुख्य प्रवचन स्थळाच्या भूमीवर जैन परंपरेनुसार क्षेत्र विशुद्धी हा मंगल विधी नुकताच संपन्न झाला.

गुरु सुमती शिष्य उपप्रवर्तक अभिषेकमुनी म.सा., गुरु हेम शिष्य उपप्रवर्तक आशिषमुनी म.सा., गुरुवर्या विभाश्री म.सा. तसेच साध्वी डॉ. आभाश्री म.सा. यांच्या पावन सान्निध्यात हा समारंभ पार पडला.

चातुर्मास सोहळ्याचे प्रमुख आधारस्तंभ सौरभ पराग बोरा यांच्या मातोश्री प्रमिलाबाई हेमराज बोरा व भगिनी डॉ. निलिमा बोरा यांच्या हस्ते जैन धार्मिक विधीनुसार कलशपूजन व मंगल विधी संपन्न झाले. यावेळी चातुर्मास समितीचे पदाधिकारी अशोक बाबुशेठ बोरा, राजेश भंडारी, आदेश चंगेडिया, विलास कटारिया, अनिल पोखरणा, सुरेश कांकरिया, मनसुख गुंदेचा, राजकुमार बोरा, सचिन देसरडा, विजय गुगळे, अभय गांधी, अभिजीत गांधी, विनोद कटारिया, आदींसह सकल जैन समाजाचे व उपनगरातील सर्व श्रावक संघाचे पदाधिकारी अनिल कटारिया, कांतिलाल गांधी, दिलीप मेहेर, संदीप गांधी, अतुल शिंगवी, अशोक बलदोटा, संतोष शेटिया, दर्शन गांधी, कचरदास लुंकड, ईश्वर बोरा, पेमराज पोखरणा, विजय गुगळे, जवाहर कटारिया, किशोर गांधी, संजय ताथेड, किरण रांका, रमेश सोनीमंडलेचा, अरविंद गुंदेचा, अनिल लोढा, विनोद गांधी, राजू ताथेड, सुभाष पोखरणा, सचिन डुंगरवाल, जितेंद्र नहार, अशोक गांधी, सुधीर चोपडा, पोपट कटारिया, धनेश बरमेचा, किशोर गुगळे, सुधीर मुथा, योगेश चंगेडिया, हिरालाल चंगेडिया, पारस कासवा, सुभाष बोथरा, संतोष बोरा, अशोक भंडारी, संजय चोपडा, सुभाष बायड, संजय गांधी, संजय बोरा, मनोज गुगळे उपस्थित होते.

याप्रसंगी चातुर्मास समितीचे बाबुशेठ बोरा यांनी सांगितले की, उपाध्याय प्रवर प्रवीणऋषी म.सा. यांचा २०२६ मधील चातुर्मास हा शिखर चातुर्मास ठरणार असून चार महिन्यांच्या या कालावधीत विविध धार्मिक प्रवचने, साधना शिबिरे, आध्यात्मिक उपक्रम व धर्मप्रभावना कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

आनंदधाम येथे वाढत्या भाविकसंख्येमुळे जागेची मर्यादा लक्षात घेऊन आनंदधाम शेजारील विस्तीर्ण पटांगणावर सुमारे ५० हजार चौरस फूट क्षेत्रफळाचा भव्य समवशरण मंडप तसेच २५ हजार चौरस फूट क्षेत्रफळाचे भोजनगृह उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी परमपूज्य गुरुदेवांच्या प्रवचनांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणार असून, कालपासून मंडप उभारणीच्या कामालाही प्रत्यक्ष प्रारंभ झाला आहे. त्याच प्रमाणे आनंदधाम येथे पूर्ण चातुर्मास कार्यकाळात गुरुदेवांचा मंगलमय वास्तव्य असणार असून आनंदधाम येथे देखील शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहेत. अर्हम विज्ञा प्रणेते उपाध्याय प्रवर प्रवीणऋषी म.सा. यांनी प्रशिक्षित केलेल्या कल्याण मित्र टीमच्या माध्यमातून हा क्षेत्र विशुद्धी कार्यक्रम पार पडला. जैन आगम व शास्त्राधारित मंगल विधींमार्फत सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांचे आयोजन करणारी ही टीम कार्यरत आहे. आगामी चातुर्मास काळात हजारो साधकांना ज्ञानार्जनाची संधी मिळणार असून शेकडो साधकांची तपश्चर्या व आराधना या पावन भूमीत फलद्रूप होणार आहे. त्या दृष्टीने आनंद तीर्थ-समवशरण भूमीवरील क्षेत्र विशुद्धी हा सोहळा चातुर्मासाच्या तयारीतील एक महत्त्वपूर्ण आणि मंगलमय टप्पा ठरला आहे, असे यावी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे समारोपिक संभोदनात आदेश चंगेडिया यांनी उपस्थितांना सांगितले की, आगामी समर्पण - सर्व कल्याण शिखर चातुर्मास २०२६ हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून संपूर्ण समाजाच्या एकजुटीचा आणि समर्पणाचा महोत्सव आहे.

हा चातुर्मास अहिल्यानगरच्या धार्मिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जावा, यासाठी सर्व उपनगर श्रावक संघ, महिला मंडळे, युवक मंडळे तसेच धर्मप्रेमी बंधू-भगिनींनी तन-मन-धनाने सहभाग नोंदवावे असे आवाहन त्यांनी केले. गुरुदेवांच्या कृपेने आणि सर्वांच्या सहकार्याने हा शिखर चातुर्मास अभूतपूर्व, अविस्मरणीय आणि भावी पिढ्यांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यानंतर त्यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ रद्द करावा

## विहिंपचे मंदिर एवम अर्चक पुरोहित आयामाची राज्य सरकारकडे मागणी


आ. अक्षय कर्डिले यांना निवेदन देताना गजेंद्र सोनवणे, श्रीकांत नांदापूरकर, हरिभाऊ डोळसे, अमोल भांबरकर, मनोहर भाकरे आदी.

नगर - मंदिरे ही हिंदू समाजाची शक्ती केंद्र आहेत. मंदिरांना शेकडो वर्षांपूर्वी समाजहित, धार्मिक परंपरा, नित्य पूजा-अर्चा, उत्सव, अन्नदान, धर्मशाळा, वेदपाठशाळा आणि सामाजिक उपक्रमांसाठी इनामी जमिनी देण्यात आल्या होत्या. या जमिनी केवळ मालमत्ता नसून हिंदू समाजाच्या श्रद्धा, परंपरा आणि धार्मिक व्यवस्थेचा आधार आहेत. प्रस्तावित कायद्यामुळे मंदिरांच्या आर्थिक स्रोतांवर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ रद्द करावा, अशी मागणी विहिंपचे मंदिर एवम अर्चक पुरोहित आयामाच्यावतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन विहिंपचे मंदिर एवम अर्चक पुरोहित आयामाच्या वतीने राहुरी, नगर, पाथर्डी मतदार संघाचे आ. अक्षय कर्डिले यांना देण्यात आले. याप्रसंगी मंदिर एवम अर्चक, पुरोहित आयामाचे विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, जिल्हा सहप्रमुख हरिभाऊ डोळसे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, मनोहर भाकरे, हभप काळे महाराज, डॉ. वसंत झेंडे, दिनेश परदेशी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा हा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा असून हिंदू धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा संपूर्णतः रद्द करून नवीन तज्ञ समितीमार्फत व्यापक अभ्यासानंतर नवीन प्रारूप तयार करण्यात यावे, मंदिरांच्या मालमत्ता, परंपरा आणि धार्मिक स्वायत्ततेचे संरक्षण करणारी स्पष्ट तरतूद करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्रातील विविध देवस्थानांनी आणि विश्व हिंदू परिषदेतर्फे करण्यात येत आहे.

